उमाळा

साने गुरुजी

पू. साने गुरुजी जन्मशताब्दीनिमित्त

उमाळा

साने गुरुजी

प्रस्तावना
पु. ल. देशपांडे

चेतश्री प्रकाशन, अमळनेर

प्रकाशिका
सौ. यशोदा वा. सोनार
चेतश्री प्रकाशन
'मुक्ताई', धुळे रोड,
अमळनेर ४२५४०१.

आवृत्ती : १ ऑगस्ट १९९८

मुखपृष्ठ : अनिल उपळेकर

मुद्रक
श्री. सुनील अंबिके
श्री समर्थ साई मुद्रण
४२६, सोमवार पेठ, बरके आळी,
पुणे ४११००१.

मूल्य : रुपये ४०/-

पु. ल. देशपांडे

आपल्या महाराष्ट्राच्या परंपरेमध्ये भगवंतापेक्षा भक्ताला महत्व जास्त आहे. आपण पंढरपुरची पालखी जाताना पाहिली असेल तर विठ्ठलाचं नाव जितक्या वेळा घेतलं जात नाही, त्याच्या दसपट 'ज्ञानोबा तुकाराम' म्हटलं जातं. उद्या पंढरीच्या पालखीतलं 'ग्यानबा तुकाराम' म्हणायचं नाही असा जर एखादा निर्बंध काढला तर ती पालखी ओस पडेल, याची मला खात्री आहे. कारण भक्तांच्या नावाच्या नादामध्ये शेकडो मैल चालले जातात. मला हा मान मिळालेला आहे, याचं कारण मी साने गुरूजींचा भक्त आहे. या भुमिकेतूनच मला हा मान मिळालेला आहे. हे मी ओळखलेलं आहे.

देवाच्या भक्तीत मला काही फारसा रस नाही. परंतु देवत्वाच्या भक्तीमध्ये मला अतिशय रस आहे आणि असं देवत्व जीवनामध्ये सहसा चटाचट आढळत नाही. पण मी एका अशा जमान्यामध्ये वाढलो. तरूण होतो त्या काळामध्ये - जिथं नजर टाकावी तिथं देवत्व असलेली माणसं आहेत असा विश्वास वाटावा, अशी माणस आयुष्यामध्ये पाहावयास मिळाली. त्याच्यामध्ये आपल्या अद्वितीय

तेजाने तळपणारे जसे साने गुरूजी होते, तसे जीवन म्हणजे आपली समिधा आहे अशा रीतीने वागणारे सेनापती बापट होते. बोरकरांची एक कविता आहे,

'जीवन त्यांना कळले हो,
मीपण त्यांचे पक्व फळापरि
सहजपणाने गळले हो'

तर ज्यांचं पक्व फळापरि सहजपणाने 'मी-पण' गळलं, अशी माणसं माझ्या आयुष्यात मी पाहिली आहेत. त्यांच्यात साने गुरूजींच्या तुलनेचं दुसरं मला कोणी आढळलेलं नाही. स्वतःला इतकं वगळून जीवनामध्ये दुसऱ्यासाठी जगणं, ही किमया या पृथ्वीतलावर होऊ शकते असं जर कोणी अनुभवाला आणून दिले असेल, तर ते साने गुरूजींनी अनुभवाला आणून दिले. सानेगुरूजींच्या भाषेमध्ये, व्याकरणामध्ये 'मी' नावाचा शब्दच नसावा असं मला वाटतं. ते आम्ही याच भावनेने जगले. त्यामुळे त्यांचा आनंद, त्यांचे चैतन्य, त्यांचे तारूण्य, त्यांचे कारूण्य, त्यांचे साहित्य, हे सानेगुरूजींचे साहित्य न होता आपल्या सगळ्या हजारो लोकांची वाचा, ती सानेगुरूजींच्या लेखणीतून बाहेर पडली आहे. सानेगुरूजींनी मी साहित्यिक आहे असं कधी म्हटलं नाही. ते म्हणायचे मला काही लिहिता येतचं नाही. ज्याला उत्तम लिहिता येते तोच असं धैर्याने सांगु शकतो की, मला काही लिहिता येत नाही, तो साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांच्या मागे लागलेला असतो की मी कवि आहे. मला स्टेजवर चान्स द्या. सानेगुरूजींनी हजारो कविता लिहिल्या, पण साहित्य संमेलनात जाऊन कविता वाचाव्या असं त्यांना कधीच वाटलं नाही. कारण त्यांची धारणाच अशी होती की, 'इदं न मम', 'हे माझं नाही आहे.' या भावनेनं जगायचं. सानेगुरूजी 'इदं न मम' या भावनेने जगले. सानेगुरूजींच्या साहित्याचा मुळ स्त्रोत विचाराल तर तुकोबांनी सांगितल्याप्रमाणे -

फोडिले भांडार,
धन्याचा हा माल,
मी तो हमाल भार वाही'

या भावनेनं सानेगुरूजींनी लोकांसाठी लिहिलं. सानेगुरूजींनी साहित्यिक होण्यासाठी साहित्य लिहिलं असतं, तर ते फारतर साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष होऊन दुसऱ्या वर्षी विसरले गेले असते; परंतु त्यांनी साहित्यिक, ग्रंथकर्ता म्हणून साहित्य लिहिले नाही आणि तसं न लिहिण्याचीच या भारतामध्ये परंपरा आहे. ही परंपरा आपण विसरतो. भारतातील परंपराच अशी आहे की, आपण उत्तम काही केलं तर शक्य तितकं नामानिराळं व्हावं. मी तुम्हाला या अजिंठाच्या परिसरातल्या लोकांना सांगाव असं नाही. अजिंठा वेरूळला उत्कृष्ट शिल्प केलेले आहे; पण एकाही शिल्पकाराने आपलं नाव लिहिलेलं नाही. पाहायला येणारे लोक मात्र आपली नावं लिहितात तिथं. 'गायकवाड गुरूजी, ७ वी अ, अमुक शाळा.' इथली अलिप्त राहण्याची परंपरा आहे. हा कोण आहे याच्याशी तुम्हाला काय करायचंय?

सानेगुरूजींचा विचार अगदी साधा होता की, यर्थाथपणाने जगायचे असेल तर दुसऱ्यासाठी जगा. हा इतका साधा उपदेश होता. सानेगुरूजींना जीवनामध्ये सगळ्यात जर विचार कसला केला असेल तर तो दुसऱ्याचा केला आणि संस्कृती याचा अर्थच मी असा करतो की, दुसऱ्याचा विचार प्राधान्याने मानणे म्हणजे संस्कृती. या जगामध्ये मला जसा जगायचा हक्क आहे, तसा हक्क असणारे हजारो लोक आहेत. हे मानणे म्हणजे संस्कृती. ज्याला इंग्लिशमध्ये 'रूल्स ऑफ द रोड' म्हणतात. मीच डाव्या बाजूने का चालायचे? जर सगळ्यांनीच मधून चालायचे ठरवले, तर असंख्य मुडदेच रस्त्याला दिसायला लागतील. माझा जरी नसला तरी माझ्या जवळच्या माणसाचा दिसेल; म्हणून मला हे पाळले पाहिजे. दुसऱ्याचा विचार करून मला चांगले वाटले पाहिजे; यासाठी केले पाहिजे. याचे कारण काय? तर माणुसकीचा पहिला धर्म सानेगुरूजींनी सांगितला तो हा आहे की, इतर प्राण्यांना न मिळालेली अशी एक देणगी मनुष्य प्राण्याला मिळालेली आहे; ती, म्हणजे दुसऱ्याविषयीची सहानुभूती. एका कुत्र्याने दुसऱ्या कुत्र्याला दगड मारला, तर या कुत्र्याच्या डोळयामध्ये पाणी आलेले मी पाहिले नाही. किंवा बैलगाडी ओढताना एका बैलाला फटका मारला तर बाजूचा बैल संपावर गेला, असे काही आपण ऐकलेले नाही. संपावर माणसे योग्य कारणासाठी जातात, असे नाही; पण आपल्याला मात्र दुसऱ्याचे दुःख पाहून, त्याला झालेल्या वेदना पाहून,

आपल्यालाही त्या व्हाव्यात अशी योजना निर्सगाने दिलेली आहे आणि अशी योजना निसर्गाने करून देताना एक प्रचंड अशी काही निर्मिती, मी याला निर्मितीच म्हणतो, अशी निसर्गाने आपल्यामध्ये ठेवलेली आहे. या निर्मितीला आपण 'अश्रू' असे म्हणतो. इतकी सुंदर निर्मिती या जीवनामध्ये दुसरी कुठलीही नाही. माणसाचे माणूसपण सगळ्यात जास्त त्याच्या डोळ्यांतून झरणाऱ्या आसवांतून प्रकट होते. म्हणून आईचे मोठेपण सांगताना गडकऱ्यांनी इतके सुंदर लिहिले आहे की,

हे हृदय असे आईचे, मी उगाच सांगत नाही,
जे आनंदेही रडते, दुःखात कसे ते होई?

त्या आनंदानेही तिच्या डोळ्यांतून पाणी येते. ते पाणी दिसायला लागते आपल्याला, त्यावेळी मनाला स्नान घडते. त्यावेळी ते आलेले आसु, हे तीर्थ म्हणून आलेले असतात. पाणी आणि तीर्थ यांच्यातला फरक तरी काय? पाणी हे आपल्या शरीराला स्नान घालते आणि तीर्थ हे आपल्या मनाला स्नान घालते. मनाला जे द्रव्य स्नान घालते, त्यालाच आपण तीर्थ म्हणतो आणि अश्या प्रकारचे 'अश्रु'तीर्थ जसे धारा तीर्थ असते, वरूण तीर्थ असते, अरूण तीर्थ असते, काशी तीर्थ असते. अशा प्रकारच्या पवित्र अश्रु-तीर्थामध्ये सानेगुरूजींनी आपल्या साहित्यातून आपल्याला उभे करून दिले आहे. ज्यांना साने गुरूजी कळले नाही, ते गधडे म्हणालेत की, साने गुरूजींचे वाङ्मय म्हणे रडके होते. ज्या माणसांना जीवनातल्या आसवांचे महत्व कळलेले नाही, त्या माणसांना केवळ आणखी दोन पाय नाहीत म्हणून माणूस म्हणायचे, यापलिकडे काय अर्थ? सानेगुरूजी रडके नि हे शहाणे! साहेबांचे बुट चाटत ज्यांचे आयुष्य गेले, त्यांनी सानेगुरूजींना अशक्त, बुईक, दुबळे म्हणावे! सानेगुरूजींचे सौम्य दर्शन पुष्कळांना झालेले असेल, पण सानेगुरूजींचे विश्वरूप दर्शन ज्यांना झाले, त्यांना सौम्य आणि विश्वरूप यांच्यातला फरक त्यावेळी पहायला मिळाला.

मला त्यांचा एक प्रसंग आठवतो. एरवी सानेगुरूजींना मी लहान मुलांना गोष्टी सांगताना पाहिले. त्या गोष्टी सांगताना त्या लहान मुलांत लहानात लहान मुल जर कोणी असेल तर सानेगुरूजी हाच मनुष्य होता. ही मुले मोठी वाटवीत इतके

नगर वाचनालय सातारा.
बाल विभाग

सानेगुरूजी छोटे वाटायचे. हे सानेगुरूजी परळला कामगार मैदानावर उभे राहायचे. मला तो प्रसंग अजुनही आठवतो आहे. आम्हाला दर्शन असे झालेय़ सानेगुरूजींचे. मुलांना प्रेमाने जवळ घेणारे.

त्या कामगार मैदानावरती भाषणबंदीचा हुकूम बजावला सानेगुरूजींच्यावर. भाषणबंदीचा हुकूम बजावल्यानंतर तो हुकूम हातात घेऊनच सानेगुरूजी स्टेजवर चढलेत. अन् तुम्हाला खरोखरच सांगतो की, एखादे चंदनाचे झाड जळाल्यावर कसे व्हावे? आगही दिसेल आणि सुगंधही आपल्याला येईल. अशा प्रकारची त्यांची ती वृत्ती पाहिल्यानंतर, उभे राहिले नि म्हणाले, ''भाषणबंदी, आमच्या देशातले हजारो लोक फासावर गेलेत, तुरूंगात गेलेत, जन्मठेपेवर गेलेत आणि जो मुलभूत हक्क मिळावा, आम्हाला मुक्तपणे बोलण्याचा- त्यासाठी आम्ही झगडलो- तो आमचा हक्क स्वातंत्र्यात हिरावून घेणारा हा हुकूम आहे.' आणि त्यादिवशी त्यांनी भाषण केले. स्वातंत्र्य म्हणजे काय आणि या जगात त्यासाठी कोणी कुठे काय काय हाल अपेष्ठा सहन केल्यात यासंबंधी अप्रतिम, तेजस्वी निरूपण केले. असे वाटले की, काल गच्चीवर लहान मुलांना गोष्टी सांगणारे सानेगुरूजी, ते हेच सानेगुरूजी आहेत काय? आणि असे करता करता मी जरा नाटकाचा मनुष्य असल्यामुळे शेवटची नाट्यमय घटनाही माझ्या लक्षात राहिली. त्यांनी असे केले की, असले जे हुकूम येतात याची आम्ही काय पर्वा करतो, ते मी आपल्याला दाखवतो; म्हणून त्यांनी टरकन् स्टेजवरतीच तो हुकूम फाडला. त्यानंतर त्यांना पकडायला आलेला जो पोलीस अधिकारी होता, त्यालाही कर्तव्यपालन करणे इष्टच होते. तो- तुम्हाला खरेच सांगतो- 'आयुष्यातले महत् पाप मी करतो आहे,' अशा चेहऱ्याने गुरूजींना म्हणाला, 'मला तुम्हाला या गाडीत बसवून नेले पाहिजे.' गुरूजी ताबडतोब त्याच्या मागे जाऊन शांतपणे त्याच्या गाडीत बसले. त्याच्यावर मुळीच रागावले नाहीत. असे रागावणे हे मुळी त्याच्या स्वभावातच नव्हते. आपल्याला माहित असेल की, बेचाळीसच्या चळवळीमध्ये त्यांना पळवून न्यायच्या इराद्याने ससून हॉस्पिटलमध्ये आजारी म्हणून आणले होते. त्यांना तेथून मग निसटायचे होते. तब्येत बरी नाही या बहाण्याखाली तिथे त्यांना आणून ठेवले. अन् चौथ्या, पाचव्या दिवशी ते लोक आले नि म्हणाले,'गुरूजी, आता निसटायचे.' 'नकोरे

बाबा' ते म्हणाले, म्हणजे त्याचे काय झाले आहे, माझ्यावर जो पहाऱ्याला हवालदार नेमला आहे ना त्याची नि माझी चार दिवसात ओळख झाली आहे. त्याची लहान लहान मुले आहेत. मी जर पळालो तर त्याच्या नोकरीवर गदा येईल. कटबीट खलास ! कुठला कट? त्या हवालदार अन् त्या मुलांसाठी त्यांचे अंतःकरण रडत होते. त्यासाठी ते तुरूंगातल्या हालअपेष्टा सहन करायला तयार झाले. मला तुम्ही सांगा, असले 'अश्रू' आपल्या डोळ्यातून येण्याचे भाग्य तुमच्या माझ्यापैकी किती जणांना लाभले आहे? हास्य फुटण्याचे भाग्य लाभते, त्यापेक्षासुद्धा सहानुभूतीने डोळ्यातून 'अश्रू' येण्याचे भाग्य हे जास्त महत्वाचे आहे. सानेगुरूजी काय स्वतःसाठी रडले काय? सानेगुरूजी काय स्वतःच्या मुलीचे लग्न होत नाही म्हणून वैतागले होते काय? सानेगुरूजी आपल्याला वरची बढती मिळत नाही म्हणून चिडले होते की सानेगुरूजी आपल्याला अजून पद्मभूषण केले नाही या चिंतेत होते काय? ते कसल्याही चिंतेत नव्हते. त्यांना एकच कळत होते की हा देश, जो पर्यत या देशातील लहान मुल आनंदी दिसत नाही, तो पर्यत हा देश अभागीच राहणार. म्हणून सानेगुरूजींनी आपले लक्ष एखाद्या निष्णांत माणसाप्रमाणे एका जागी ठेवले. त्यांनी या देशातल्या सगळ्यात महत्वाचा बिंदू काय मानला होता. उपाशी लहान मुल ही देशाची बदनामी मानली. आपले पाप मानले. म्हणून त्यांनी एक मोठा मंत्र आपल्याला सांगितला,

करी मनोरंजन जो मुलांचे
जडेल नाते प्रभुशी तयाचे ।

त्यांनी पुजा कोणाची केली? तर लहान मुलांची केली आणि लहान मुलांना आनंदित ठेवणे हे कर्मकठोर असे काम आहे. लहान मुले सर्वांनाच आवडतात; पण रडणारे मुल फक्त आईचेच असते. रडणाऱ्या मुलाला आईशिवाय कोणी जवळ घेत नाही. सानेगुरूजी हे जीवनभर असे 'आई' होऊन राहिले आणि आई यासारखी पदवी दुसरी कुठलीही नाही. मी तुम्हाला सांगतो, पंढरपुरच्या- त्यावेळी त्याला विठाई म्हणतो. त्याला आपण विठ्ठलराव साहेब वगैरे असे काही म्हणत नाही! विठ्ठलरावजी साहेब - हल्लीच्या राजकीय पद्धतीच्या प्रमाणे त्या 'राव'ला

आणखी एक 'जी' जोडावा लागतो! तो विठ्ठल म्हणजे विठाई माऊली. 'माऊली' ही सर्वात मोठी पदवीही आपण मानतो. ज्ञानेश्वराबद्दल जेव्हा आम्हाला म्हणायचे तेव्हा आम्ही ज्ञानोबा माऊली म्हणतो. ज्या मुलाचे नाव ज्ञानेश्वर असते, तिथे आमच्याकडे सातारा, सांगली जिल्ह्यामध्ये व पंढरपुरला त्याला ज्ञानेश्वर अशी हाक मारत नाहीत. त्याला माऊली अशी हाक मारतात. म्हणजे तो पुरूष असतो पण त्याला हाक मारतात 'माऊली' अशीच ! कारण ज्ञानेश्वर म्हणजे माऊली ! सगळ्यात मोठे मानाचे स्थान दिले असेल आम्ही तर 'माऊली' हे विशेषण वापरले. पण माऊली होणे ही गोष्ट काही तितकी सोपी नाही. मुलांना जन्म देते ती माऊली असते असे मला वाटत नाही. मुलांना जन्म देणे ही निसर्गाने घडविलेली प्रक्रिया आहे. त्यात बाईचे कर्तृत्व आहे असे वाटत नाही. परंतु जी बाई आपल्या जीवनाचे सर्व सार हे रोपटे वाढविणे असे मानते, तेथे अहंपण पक्व फळाप्रमाणे गळलेले असते. आपल्या आईचे सर्वात सुंदर दर्शन आपल्याला कुठे होते? आपण थोडे दुष्ट असलो तरी ते कुठे होते ते सांगतो आपल्याला. मोठ्या हौसेने तिने स्वैपाक केलेला असतो आणि आपण नंतर आई जेवायची आहे, हे विसरून सगळे संपवलेले असते आणि ज्यावेळी आई नुसत्या लोणच्याबरोबर भात खाते, त्यावेळी जर आईला म्हटले की, 'आई, अग तुला काही राहिलेले नाही;' तर ती म्हणते, 'अरे, तुम्ही बाबांनो एवढे जेवलात तेव्हाच पोट भरले माझे'. हे जिचे होते तीच आई! मुलाला जपणे याचा अर्थ वेडे-वाकडे लाड करणे एवढेच नव्हे ! नवऱ्याला जपणे किंवा पतिदेव मानणे म्हणजे कसेही चालवून घेणे असा अर्थ नव्हे, तर या भुमिकांमध्ये यायला तुम्हाला काहीतरी द्यावे लागते. सानेगुरूजींनी आई होऊन हे दिले. तुम्हाला ठाऊक असेल की जगातल्या कुठल्याही क्रांतीकारकाच्या इतिहासात तुम्हाला असे आढळणार नाही, की क्रांतीकारक म्हणून जमलेली पोरे, ती गावाहून जाऊन आल्यानंतर भुकेलेली असतील म्हणून त्यांना कुणी करून वाढले; पण सानेगुरूजी स्वतः पोळ्या तयार करून त्यांना वाढत असत. ही आई याला आई म्हणायचे !

आई, पत्नी, सौभाग्यवती वगैरे शब्द इतके सहज आणि चुकीचे आपण वापरतो की, लग्न झाले की ती त्याची बायको होते. त्या गोष्टीवरती माझा विश्वास

नाही. ती त्याची बायको म्हणून व तो नवरा म्हणून एकमेकांची कर्तव्य काय हा प्रश्न आहे. नवऱ्याने पाचशे रूपयेच पगार असताना पाच हजार रूपयांचा जर हिऱ्याचा दागिना आणला, तर हे पाच हजार रूपये तुमच्याकडे कोठून आले ते आधी सांगा, तरच हे हिऱ्याचे दागिने मी घालीन असे म्हणणारी जी बायको, ती बायको ! नाहीतर हिऱ्याचे दागिने घालते आणि कधी एकदा शेजारणीला जाऊन गळा दाखवते, असे जिला झाले ती बाई पत्नी नव्हे. ती मादी आहे. ती स्त्री नाही. पुरूषाला जर मोठे व्हायचे असेल, तर त्याला नवरा व्हावे लागेल, त्याने नुसते नर होऊन भागायचे नाही. स्त्रीने माता व्हायला पाहिजे. तिने नुसते मादी होऊन चालणार नाही. मी तर नेहमी म्हणतो की, जर बाई हातात जळके लाकूड घेऊन उभी असेल, अन् नवऱ्याला म्हणेल, 'हरामखोरा ! अगोदर ही नोटांची चवड कुठून आणलीस सांग ! नाहीतर माझे कुंकू एका हाताने पुसून दुसऱ्या हाताने तुला पेटवते मी !' असे करणारी बाई निघाली, तर या देशात तुम्हाला अनाचार ऐकू येणार नाही. कारण सगळे लबाड नवरे म्हणतात, 'आम्ही काय करणार ! आमच्या वाईफला ते पाहिजे होते.' तुमच्या वाईफला सगळे पाहिजे. तुमच्या वाईफला दुसरा हजबंड पाहिजे असता तर आणून दिला असता का ? बायकांच्यावर सगळ्यात मोठा अन्याय जर कुठे होत असेल तर तो इथे होतो. बायकांसाठी म्हणून नवरे पैसे खातात ही जी समजूत होती, तिथे मातृत्व आणि पितृत्व हे शब्दच मुळी चुकीचे व्हायला लागतात. सानेगुरूजींनी या शब्दाचा खरा अर्थ काय, मातृत्व या शब्दाचा खरा अर्थ काय, हे दाखवून दिले. वेड्या-वाकड्या कुठल्याही मार्गाने का होईना माझ्या मुलाला तेवढा मोठा करा म्हणणे म्हणजे मातृत्व नव्हे. परंतु माझा मुलगा असेल, पण त्याच्यापेक्षा स्वैंपाकिणीचा मुलगा, त्याचा पहिला नंबर असेल, तर त्याचे कसे होईल ? याची चिंता जिच्या डोळ्यांमध्ये आहे, ती खरी माता. म्हणजे ती मातृत्वाचा धर्म पाळते आणि दुसरी फक्त निसर्गधर्माने आई झालेली. जाणीवेच्या धर्माने आई होणे ही सोपी गोष्ट नाही. सानेगुरूजी हे अशा प्रकारची माता झाले. म्हणून त्यांना जिथे जिथे स्त्रियांच्या दुःखाचे कढ दिसले, स्त्रियांचे अश्रू जेथून वाहतात, त्या अश्रूंची गाणी त्यांनी जिथे पाहिली, त्या महाराष्ट्रात हिंडून आयाबायांच्या कडून ती गाणी गोळा केली. मराठीतील तो एक उत्कृष्ट संग्रह

नगर वाचनालय सातारा.
बाल विभाग

आहे. महाराष्ट्रातील स्त्रीच्या मनाचे कुठल्याही कादंबरीकाराला, लघुकथाकाराला, निबंधकाराला न रेखाटता आलेले चित्र कुठे पाहायचे असेल, तर ते आमच्या बायकांनी लिहिलेल्या ओव्यात आहे आणि या ओव्या सानेगुरूजींनी घरोघरी जाऊन गोळा करून त्यांचे दोन खंड प्रसिद्ध केले. त्याच्यामध्ये त्यांनी आपल्याला खऱ्या अर्थाने महाराष्ट्राच्या स्त्री मानसाची पहिल्यांदा गाठ घालून दिली. ते लोक-वाङ्मय आहे, की लोक साहित्य आहे, की फोक लिटरेचरमध्ये त्याचे स्थान केवढे आहे, असे लिहून त्यावर पीएच. डी. मिळवणे, याला माझ्या मते काही अर्थ नाही. आम्ही विद्यार्थी होतो त्यावेळी वाचत होतो, त्यावेळी आमच्या पहिल्यांदा लक्षात आले की, आपली आई म्हणजे 'तळहाताचा पाळणा, डोळियाचा केला दिवा' अशी जी आहे ती माझी आई. असे म्हटल्याबरोबर फरकच पडला. किती सुंदर सुंदर ओव्या. ओव्या हे समृद्ध धन आहे. तर सानेगुरूजींनी त्या ओव्या गोळा केल्या. त्यामध्ये छोट्या छोट्या नोटस् लिहिल्या आहेत, त्याला तोड नाही. दुर्दैव असे की, रहस्यकथा खपण्याच्या काळामध्ये अंतःकरणात जाऊन तिथले सौंदर्य पाहाण्याची कुणाला घाई आहे ? गरजही नाही.

आज सानेगुरूजींची पुस्तके मिळत नाहीत बाजारात आणि पुस्तक मिळत नाहीत म्हणून या लहान मुलांना केवढ्या आनंदाला आपण पारखे करीत आहोत. मला एका लहान मुलाने विचारलं होतं की, 'व्हाट इज धिस श्यामची आई?' सांगणार होतो त्याला, पण म्हटलं आईबद्दलच त्याच मत वाईट होईल, म्हणून सांगितलं नाही. म्हटलं असतं, 'तुझ्या घरी देअर आर टु शेम्स; एक यूवर फादर इज ब्लडी शेम आणि दुसरे, युवर मदर टू इज अ ब्लडी शेम!' श्यामच्या आईचे पुस्तक मराठी माणसाला माहीत नाही असे ज्याने म्हटले, त्याला महाराष्ट्रीयन म्हणून जगण्याचा अधिकार नाही, असे म्हटले पाहिजे. 'श्यामची आई' हे वेदोपनिषद आहे.

कौटुंबिक जीवनात आई ही साक्षात् अशा प्रकारची मूर्ति आपल्यापुढे आलेली आहे की, कुटुंब म्हणजे काय, त्याचे लागेबांधे म्हणजे काय, याचा समाजशास्त्रीय अभ्यास जरी करायचा असेल, तरीसुद्धा सानेगुरूजींचे श्यामची आई बारकाईने वाचायला पाहिजे. लहान मुलाला आईबद्दल वाटणारी आस्था, आईला

लहानमुलाबद्दल वाटणारे प्रेम, काळजी, चिन्ता, बाप, भावंडे, त्यांचे दारि, हे सारे आपल या महाराष्ट्रातले कौटुंबिक एक 'युनिट' आहे. त्याच्यामध्ये हे फार सुंदर आलेले आहे. सानेगुरूजींचे वाड्मय याचा अर्थ जगातले जेवढे काही सुंदर सुंदर आहे ते मराठीत आणलेले आहे. सानेगुरूजींनी स्वतःला मोठे होण्यासाठी न लिहिल्यामुळे त्यांना दुसऱ्यांचे मोठेपण चटकन् दिसत होते. स्वतःच्या मोठेपणात गर्क असणाऱ्या माणसाला आरसा या पलिकडे दुसरे काहीच लागत नसते. त्याला स्वतःचेच तोंड पहावेसे वाटत असते. हा मनुष्य स्वभाव आहे. सगळ्यात जास्त स्वतःवर आपले प्रेम असते हे खरेच आहे. ग्रुप फोटो जर आला, तर त्यात दुसऱ्याचा फोटो न पाहता आपण आपला फोटो पहिल्यांदा पाहतो, मग बाकीच्या सगळ्यांचे पाहतो. हा मनुष्य स्वभाव आहे, पण त्याला काही मर्यादा असते. ते सानेगुरूजींचे वाड्मय म्हणजे टॉलस्टाय मिळाला आम्हाला वाचायला, ला मिझरेबल वाचायला मिळाले. जगातला उत्तम एन्शंट मरीनर वाचायला मिळाले. जगातले उत्तम साहित्य वाचायला मिळाले. अशा प्रकारचा आनंद मराठीतून मिळाला आणि कुणाच्या मराठीतून तर सानेगुरूजींच्या! ज्यांचे मराठी म्हणजे नुसते एका शद्बाला जास्त शद्ब झाला तर कदाचित त्या ओळीला वजन होईल, या भितीने त्यांनी शद्ब बाजूला ठेवलेला. इतक्या नाजूकपणाने मराठी त्यांनी लिहिलेली! ही सुंदर अशाप्रकारची शैली, इतक्या सुंदर अयप्रकारचे लिहिलेले हे मराठी! भाषेचा आदर्श म्हणून मुलांपुढे जातील. अश्रूंचे महत्व म्हणजे काय असते जीवनामध्ये, जिव्हाळ्याने एकत्र येणे काय, दुसऱ्यासाठी मन ओलावणे म्हणजे काय, याचा कुठेतरी साक्षात्कार आजच्या जगामध्ये, जिथे फक्त मी-मी-मीचा आग्रह चालला आहे, त्या जगामध्ये दिसेल, सानेगुरूजी जोपर्यत चंद्र-सुर्य आहेत तोपर्यत 'आऊट ऑफ डेट' कधीच होणार नाहीत. सानेगुरूजी 'आऊट ऑफ डेट' झालेत असे म्हणणे म्हणजे, माणसातला चांगुलपणा 'आऊट ऑफ डेट' झाला, पावित्र्य 'आऊट ऑफ डेट' झाले, असे म्हणण्यासारखे आहे. 'सात्विकता नाहिशी झाली जगातली' असे म्हणण्यासारखे आहे. दुसऱ्यासाठी जगणे, श्रमणे, दुसऱ्यासाठी काहीतरी करावे असे वाटणे, हा माणसाचा विचार नाहीसा झाला असे म्हणण्यासारखे आहे. सानेगुरूजी 'आऊट ऑफ डेट' झालेत याचा अर्थ मानवताच 'आऊट ऑफ डेट'

नगर वाचनालय सातारा.
बाल विभाग

झाली असे म्हणण्यासारखें आहे. इतके ते मानवतेच्या मध्ये रमलेले, आत घुसलेले होते. बरे हे घुसलेले असताना, नुसते शद्बांचे घन लोकांच्यावर टाकून नाही. स्वतः त्यांच्यासाठी कष्ट केलेत, मुलांना बरोबर घेऊन गेलेत, स्वतः दाखवले, चांदण्याची शोभा दाखविली. सानेगुरूजींच्या जीवनामध्ये त्यांनी जसे अश्रू पाहिलेत तसे एक निसर्गाचे स्वरूपही. सानेगुरूजींनी इतक सुंदर पाहिलेलं आहे की, ते आपण बारकाईनं वाचा. सानेगुरूजींनी दुःखितांचे जीवन पाहिले, त्यांच्याबद्दल लिहिले. धडपडणारी मुलं या देशामध्ये व्हावीत याची चिंता वाहिली. उत्तम तत्वज्ञानाचा, गीतेसारखा ग्रंथ, त्यांनी त्याच्यावरचे भाष्य फुकट गेले असते, जर सानेगुरूजींनी जेलमध्ये ते लिहून ठेवले नसते तर! 'गीता प्रवचने' सारखा अमोल ग्रंथ आज आपल्याला वाचायला मिळाला नसता. एक दुय्यम भुमिका घेऊन विनोबांच्या जवळ बसून त्यांनी ते केले. सानेगुरूजी व विनोबा यांच्यात श्रेष्ठ कोण नि कनिष्ठ कोण हे ठरविताच आले नसते, इतके ते दोघेही मोठे आहेत. तितक्याच तोलाचे आहेत असे माझे मत आहे. अशा वेळेला जाणून बुजून दुय्यम भुमिका घ्यायची आणि एखाद्या स्टेनोग्राफरसारखे, ते बोलतात ते सर्व लिहून काढायचे. अर्थात एक गोष्ट खरीच आहे की, विनोबा बोलताना बरोबर लिहून घ्यायला सानेगुरूजीच पाहिजेत. कृष्णाला जर सांगितले असते की पु. ल. देशपांड्यांना गीता सांग, तर घाबरला असता कृष्ण ! तुम्हाला सांगतो, त्याला अर्जुन होता तिथं म्हणून सुचलें सांगायला. त्याला शिष्यही त्याच तोलाचा लागतो. ऋजुता असावी लागते. घेणारे पात्र एवढे मोठे असावे लागते. आम्ही करवंटी घेऊन जाणार आणि खीर वाढा म्हणून सांगणार! वाढणाराला सुद्धा वाटावे की, 'अरे मी सुंदर केली आहे खीर अन् कशात वाढतो आहे,' असे वाटावे. तर सानेगुरूजींनी लिहून घेतला तो तत्वज्ञानाचा ग्रंथ हे सर्व मराठीतील धन आहे.

सानेगुरूजींचा एक विचार होता. जो आजच्या काळात तर मला फार महत्वाचा वाटतो. तो म्हणजे 'आंतरभारती'चा विचार. ज्यावेळेला रोजचे वर्तमानपत्र आम्हाला सांगते आहे की, 'भारत तोडो, भारत तोडो' त्या त्या वेळेला राजकीय महत्वाकांक्षा न ठेवता, सत्तेची महत्वाकांक्षा न ठेवता, केवळ भावनेच्या दृष्टीने या देशावर प्रेम करणाऱ्या, भावनेय दृष्टीने सगळ्या भारताने एकत्र यावे,

असे सांगणारे सानेगुरूजी! त्या काळाची पुन्हा आठवण करून देण्यासाठी आम्हाला सानेगुरूजींकडे गेल्याशिवाय गत्यंतरच नाही. तिथेच आम्हाला आमचे चैतन्य, आमची स्फूर्ती सापडणार आहे. या विचाराला हसतात, हा म्हातारा विचार आहे, हल्ली कोण ऐकतो, असे म्हणणारा मनुष्य स्वत: ऐकणारा नसतो, म्हणून तो असा वागतो. आजच्या काळात मी इतका निराश नाहीच. अजूनसुद्धा मला कित्येक तरूण खेड्यापाड्यात जाऊन काम करताना दिसतात. संस्था चालवताना दिसतात. सरकारी अधिकारी त्यांना आडवे आले असताना सुद्धा ते पर्वा करीत नाहीत. काही सरकारी अधिकारी आडवे न येता,उभे सुद्धा येणारे आहेत. तेही चांगले आहेत, त्यांची मदत घेतात. असे कार्य चाललेले आहे. माणूस इतका वाईट झालेला आहे, हरामखोर झालेला आहे, असे मला स्वत:ला कधीही वाटलेले नाही आणि ज्याक्षणी माझा माणूस नावाच्या गोष्टीवरचा विश्वास संपेल, त्यादिवशी मी लेखक, कलावंत म्हणूनही संपलेला असेल; तर माझा माणसावर विश्वास आहे. ते चांगले करतील म्हणून विश्वास आहे. म्हणून तर मी लिहित असतो- म्हणून तर मी संवाद साधत असतो.

माणसाचा माणसाशी संवादही साधणे सुटेल, त्यादिवशी सारे संपेल. सानेगुरूजींनी कशासाठी लिहिले! त्यांना ते भावत होते, ते दुसऱ्यांना सांगण्यासाठी. हा मुळी सर्व साहित्याचा, कलांचा उगमच आहे. निसर्ग सानेगुरूजींनी किती बारकाईने पाहिला आहे, पाहा! कोकणात पाऊस सुरू झाला की काय होतं? त्याचे सानेगुरूजींनी वर्णन केले आहे-

'झरे वाहायला लागलेत, रोहिणी नक्षत्र लागल्यानंतर रोहिणीचे खळ-खळ झरे वाहायला लागले; पण ते पऱ्हे, नाले, पुढे सुकले, वाळले. थोडे कुठे कुठे पाणी आहे एवढेच. पूर येऊन गेला. साकवावर पाणी आले होते. (साकव म्हणजे जो लाकडी पूल केलेला असतो, गावातले लोक त्याला साकव म्हणतात, तर त्याच्यावरती नुसता आडवा एखादा माड टाकून देतात. म्हणजे तो पूल तयार होतो. त्याला साकव म्हणतात.) पौडेवरच्या पऱ्ह्यातून मुलगा वाहून जाताना वाचला. त्याच्या पाण्याला ओढ फार आहे. अहो, गावात पऱ्हे किती? (म्हणजे सानेगुरूजींनी हे पाणी वाहत वाहत गावात कुठे चालले होते हे किती बारकाईने पाहिले आहे पाहा.

नगर वाचनालय सातारा
बाल विभाग

हा पऱ्हा असतो लहान. ओढ्याला पऱ्हा म्हणतात कोकणात.) सोनार आळीतला, खोंड्यातला, खेराच्या आळीतला, तो शिरवळचा, हा खोंडकडचा, कितीएक ओहोळांचे. प्रत्येकाचे निराळे नाव. प्रत्येक ओढ्याचा निराळा नाद. एका कवीच्याच कानाला ऐकू येईल, अशा प्रकारचा हा आहे. एवढेच नव्हे तर, तोच ओढा सर्वत्र तीच भाषा बोलत नाही. आपल्या खोंड्यातला पऱ्हा आहे ना, तो तिथल्या मढीवरच्या शेताजवळ आला की निराळीच गुण गुण करतो. निराळा नाद एवढेच नव्हे, तर तोच ओढा सर्वाकडे तीच भाषा सगळीकडे जाताना बोलत नाही. दगडावरून उड्या घेत येतो, त्यावेळेला तो खो- खो- खो- खो हसतो. पुढे गंभीर होतो, जणु काही त्याची समाधी लागते. नदीजवळचा तो अवखळ खो-खो हसणारा, उड्या मारणारा, गडबड करणारा, तोच का हा प्रवाह? तर हा मोठा लबाड आहे हो! कुळकर्ण्यांच्या साकवाजवळ संथपणा धारण करणारा हा प्रवाह पुढे ओकांच्या शेताजवळ गेला की, गाणे म्हणायला लागतो. निरनिराळ्या प्रवाहांचे हे निरनिराळे संगीत ऐकणे मोठे मजेचे आहे.

सानेगुरूजींनी हे असे निसर्गाचे संगीत ऐकले. त्याला आपण पारखे झालेले असतो. आपल्याला संगीत ऐकायचे म्हटले तर ती कळ दाबल्याशिवाय संगीत ऐकायला मिळणार नाही असे वाटते. निसर्ग आपल्यासाठी गात असतो, निसर्ग आपल्यासाठी हजारो चित्रे काढीत असतो. आकाशात सिनेमा दाखवत असतो. एकदा गांधींना कोणीतरी म्हणाले की, 'महात्माजी, तुम्ही इथे आलेला आहात तर गिरसप्पाचा धबधबा बघायला या.' तर गांधी म्हणाले 'तिथे काय आहे?' तर म्हणे वरून पाणी पडते. किती फुटावरून पडते'? तर म्हणे पाचशे फुटावरून पडते. तर गांधी म्हणाले, 'एवढेच! मी आकाशातून पाच हजार फुटावरून पाणी पडताना पाहात असतो. तेवढा तर नाहीना तो धबधबा?' हे गांधींचे सोडून द्या. तुम्हीपण जीवनामध्ये असे खूप पाहिले. या पाहिल्याची साक्ष, मोठेपण माणसाचे, त्यांनी काय पाहिले, आणि काय आपल्याला सांगितले, याच्यावर आहे. सगळी माणसे हैराण होतात. जर विचाराल कुठे गेला होता? काल पुण्याला गेलो होतो. तर काय पाहिले? काय गर्दी हो! गाढवा एवढेच पाहिलेस? तुला ती कुठूनही दिसणारी पर्वती दिसली नाही? तुला सिंहगडचा तो किल्ला दिसला नाही? तुला इतर डोंगर

दिसले नाहीत? तुला रात्रीचे चांदणे दिसले नाही? तुला काय? ते जीवनसृष्टीवर अवलंबून आहे. सानेगुरूजींची दृष्टी ही बरी नाही, हे कुणाला वाटणार? ज्याची स्वत:ची दृष्टी अधु आहे त्याला. तो त्यांना नावे ठेवणारच? आमच्याकडच्या एक बाई ताजमहल पाहायला गेल्या. ताजमहल! मुलगा रेल्वेत असल्यामुळे आईला फुकट पास होता. त्यामुळे मातृभक्ती वाहून जायला लागली त्याची. फुकट पास होता म्हणून आईलाही घेतले. चला, यापलिकडे काही नाही. बरे, मातोश्री त्यांच्या त्याच योग्यतेच्या होत्या. तर केवळ एखादी बाई आई असते, म्हणून मोठी असते, यावर माझा विश्वास नाही. महामुर्खही असतात, मुलाचा सत्यानाश करणाऱ्याही असतात. मी असे घाऊक मत कोणाबद्दल देणे बरे नाही. तर त्या तिथे त्यांनी नेले आपल्या आईला, ताजमहल दाखवायला. मातोश्रीच त्या. पुण्यातल्या कुठल्यातरी सदाशिव पेठेतल्या वाड्यात राहिलेल्या. त्यांनी तो ताजमहल पाहिला आणि म्हणाल्या, काय म्हणाल्या? 'एवढा खर्च केला? पण स्वैपाकघरच नाही.' आता त्या बाईला ताजमहल पाहणारे गाढवच वाटणार की नाही? तसे ज्या माणसाला 'अश्रू'चे मोल कळत नाही, त्याला गुरूजी रडकेच वाटणार. त्यांना काय कळणार? 'आंधळ्यासी जन अवघेची आंधळे.' त्याला सानेगुरूजींचा दोष नाही. सानेगुरूजींना अधिक चांगले दिसले. अधिक औंदार्य काय आहे ते कळले. मनाचा मोठेपणा म्हणजे काय? जगाची विशालता म्हणजे काय हे कळले. जगातल्या सर्व ठिकाणी भारत स्वतंत्र होऊन मोठा व्हावा अशा प्रकारची महत्वाकांक्षा त्यांना वाटली. सगळ्या भारतातील लोक एकत्र यावेत यासाठी ते धडपडले. ही त्यांची चूक आहे का? सगळ्या आंतरभारतीची कल्पना मी ज्यावेळी दुसऱ्या प्रांतात जातो, तेव्हा मी सांगतो, ते थक्क होतात. 'तुमच्याकडे चाळीस-पन्नास वर्षापूर्वी ही कल्पना निघाली होती?' 'हो'. ही कल्पना केवळ सरकार शिरेपर्यंत अत्यंत पवित्र आणि छान होती. ते शिरले आणि सगळा गोंधळ करून टाकला त्यांनी त्याचा. मग अधिकारी आले, पगार आले, इन्क्रीमेंट आले त्याच्यात. पण भाषेचे प्रेम नांवाचा जो महत्वाचा धागा आहे तो नष्ट झाला.

हॉस्पिटलमध्ये- सरकारी हॉस्पिटलमध्ये ज्या प्रमाणे रोग्यावरती प्रेम करावं आणि रोग्याला बरं करावं, हा विचार सोडून बाकी सगळे विचार असतात. तेवढा

एकच विचार नसतो की, 'रोगी बरा झाला पाहिजे'. तो डॉक्टरांचा डीन केव्हा होईल. असिस्टंट डीनला बाजूला हाकून याला ती जागा कशी मिळेल, याच विचारात असल्यामुळे रोगी नांवाचा कुणीतरी आलाय हा विचार नसतो- असं होतं आपलं. पण असं न होऊ देणं आणि जागवणं हे जागल्याचं काम, अशाप्रकारचे साहित्यिक करीत असतात. ते आपल्याला तुम्ही कुठे आहात ते दाखवीत असतात. ते तुमचे स्थान बरोबर काय आहे, ते कळवीत असतात. अशाप्रकारचं या सानेगुरूजींनी हे प्रचंड कार्य आपल्या जीवनामध्ये शांतपणे तेवणाऱ्या नंदादीपासारखं केलं. कुठं प्रसिद्धीचा झगमगाट नाही.

नेतृत्वाचा अर्थ काय तो सानेगुरूजी, सेनापती बापट वगैरेंनी आम्हाला समजावून दिला. ज्याचा त्यांच्याकडे काही सत्ता नसतानासुद्धा आपल्याला धाक वाटतो तो नेता. त्यांच्याकडून स्वार्थ साधावयाचा नाही. मला सिगरेट ओढू नये असं का वाटायचं? तर सानेगुरूजींना ते कळलं तर वाईट वाटेल म्हणून. सानेगुरूजी काय आमच्या कानफटात मारणार नव्हते की काही करणार नव्हते. परंतु त्यांना वाईट वाटेल असं आपल्या हातून घडता कामा नये. सेनापतींना वाईट वाटेल असं आपल्या हातून घडता कामा नये. गांधीजींच्या समोर आपण पोहोचतच नाही, पण पोहोचलोच तर त्यांच्या लक्षात येणार नाही ना असं. लोकमान्य टिळक जेव्हा मंडालेला तुरूंगात गेले, तेव्हा गडकरी म्हणाले होते की, लोकमान्य पुण्यातून गेल्यापासून समोरून येणारा मनुष्य बघून लगबगीनं विडी विझवून टाकावी असं वाटावं असा पुण्यात कोणीच मनुष्य राहिला नाही. म्हणजे ही जी एक आदराची भावना आहे, अशाप्रकारची भावना त्यांनी आपल्या मनात निर्माण केली आहे आणि अशाप्रकारची भावना तुमच्या मनात निर्माण केली म्हणजे तुम्हाला त्यांनी अधिक चांगले केले. एखाद्या माणसाच्या मनात ही मूल्यं, ही आदराची भावना वगैरे विचार असणाऱ्या त्या माणसांनाच कळणाऱ्या त्या गोष्टी आहेत. एखाद्या माणसाला म्हणजे जसं 'बहुत सुकृताची जोडी, म्हणूनी विठ्ठला आवडी' असं म्हटलेलं आहे. त्याप्रमाणं चांगल-वाईट असं वाटणं हीसुद्धा बहुत सुकृताची जोडी कळायला लागते. तो आनंद कळायला लागल्यानंतर वाम मार्गाने जाऊ नये, दुष्ट

मार्गाने द्रव्य संचय करू नये, हे विचार सांगायला तिसरा कोणी येऊन उपयोगी नाही. आपलं आपल्यातच परिवर्तन होतं.

पंढरपूरची आठवण सांगतो. त्यावेळी केलेली कविता आठवते.

हरीचे प्यारे हरिजन आम्ही आलो हरिचरणी
पंढरीराया राऊळि तुमच्या बसू धरून धरणी
चोखा मेळ्याच्या भक्तीची शक्ती आम्हाला
मिराबाईचे घुंगर चरणी सखुच्या करताला
तुकयाची वाणी मुखामधि निश्चय नाम्याचा
बंडखोर आम्ही म्होरक्या ज्ञानदेव अमुचा
शिणली गा पाऊले विठ्ठला तिष्ठुनिया दारी
उघडा दरवाजे नका हो घालवू माघारी
चोखा मेळ्याला ज्यांनी दुष्टपणे छळले
हया बडव्याहूनि का दयाळा मन अमुचे मळले?
कान्होपात्रेला ठरवूनी नीच त्याज्य पतिता
अनाचार करिती राउळि तुझ्याच भगवंता
कठीण तुज वाटे दयाळा भक्तांची खंत
का तुझ्याहि दरबारी जाहला न्यायाचा अंत?
दूर लोट वा पोटी घेई केला निर्धार
वेद-शास्त्रांचा असो वा नसोच आधार
महाराष्ट्राच्या रे सावळ्या विठ्ठल महाराजा
तुटले मस्तक तरीही तुटेल चरणावरी तुझ्या

अशा प्रकारचं हे गाणं शेवट पर्यंत म्हणत म्हणत आम्ही सर्व सेवादलातली मुलं पंढरपूरला गेलो होतो आणि गुरूजींनी त्यादिवशी तिथे जे प्रवचन केले, दारात उभे राहून 'वेदा-शास्त्रांचा असो वा नसोच आधार' म्हणजे काय? या ओळीवर

तिथे ते तासभर बोलले होते की, कसल्या बाबतीत वेदाचं नि शास्त्राचं मानायचं अन् कुठं ते झिडकारायचं- या विषयावरती ते बोलले होते. माझ्या आयुष्यातला तो सगळ्यात मोठा गौरवाचा क्षण आहे, असा मला तो वाटतो. त्यानंतर काही मला कमी गौरव मिळाले असं नाही. लौकिक गौरव म्हणतात ते, पुष्कळ तऱ्हांचे मिळाले त्याच्यानंतर. मागे न जाता! 'न मागे तयाची रमा होय दासी' अशा रीतीने मिळाले. परंतु जीवनामध्ये ज्यावेळी आपल्या मनाला धन्यता वाटावी असा तो जीवनातला एक क्षण होता.

अमळनेर नगरपालिकेतील व्याख्यान
दि. ११ जून ८४

अनुक्रम

(१) चार गोष्टी ।१।

(२) सर्वांना नम्र प्रार्थना ।५।

(३) जीवनाची आशा ।८।

(४) या राष्ट्राचे कसे व्हायचे ? ।१३।

(५) संयम नि सहानुभूती ।१७।

(६) गांधीजींचे दशावतार ।२३।

(७) कुमारांकडून अपेक्षा ।३२।

नगर वाचनालय सातारा.
बाल विभाग

१. चार गोष्टी

महात्माजीचा श्राद्धदिन भारतातच नव्हे तर सर्व जगात साजरा होतो. ते भारताच्या द्वारा जगाचीच सेवा करीत होते. कारण येथे सर्व धर्म, सर्व संस्कृती. भारत म्हणजे मानवजातीचे प्रतीक. गांधीजी जगाचे हृदय झाले होते. त्यांच्यावरच्या आघाताने सारे जग क्षणभर निर्जीव झाले होते. साऱ्या जगाने त्यांना श्रद्धांजली वाहावी हे समुचितच होय.

श्राद्ध अति पवित्र व मंगल वस्तू आहे. कृतज्ञतेची ती मधूर खूण आहे. ज्यांचे आपण श्राद्ध करतो त्याला आपण श्रद्धापूर्वक स्मरतो. श्रद्धा चमत्कारजननी आहे. यजुर्वेदात म्हटले आहे की, अदेवाला श्रद्धा देवत्व देते. जो अ-देव आहे, ज्याच्या जीवनात दिव्यता नाही, अशा माणसाला जर अमर श्रद्धा मिळली, तर त्याचे जीवन ज्वलंत होते. ते दैवी होते. श्रद्धा ध्येयाकडे घेऊन जाते, ध्येयाचा ध्यास लावते. सारे जीवन धगधगीत, रसरशीत होते. मग अन्य काही सुचत नाही, रूचत नाही.

तुका म्हणे व्हावी, प्राणासवे ताटी

नाहीतरी गोष्टी, बोलू नये

महात्माजींना श्रद्धांजली म्हणजे त्यांनी दिलेल्या ध्येयाला श्रद्धांजली. आज सर्वोदय, समन्वय अनेक शद्ध उच्चारले जात आहेत. सर्वांचा उदय व्हावा, सारे

सुखी व्हावेत म्हणून प्राचीन ऋषींपासून, ऋषीश्वरांपासून सारे सांगत आले, परंतु केवळ शद्बोच्चाराने सारे सुखी कसे व्हायचे, हा प्रश्न आहे. सर्वांचा उदय व्हावा म्हणूनच स्वराज्य हवे होते, परंतु सर्वांच्या उदयाची तीव्रता आपल्याला लागून राहिली आहे का? भांडवलदारांना शतसवलती देऊन, आणखी काही वर्षे तुमचे कारखाने राष्ट्राचे होणार नाहीत असे आश्वासन देऊन त्यांचा उदय सुरक्षित केला जात आहे. गरिबांचे काय? हा प्रश्न आहे.

महात्माजींनी स्वराज्यात चार गोष्टी हव्यात म्हणून लिहिले होते- (१) आर्थिक समता, (२)•सामाजिक समता, (३) धार्मिक समता व (४) लोकशाही. सरकारचे धोरण पंसत नसले तर शांततेने विरोध दाखवायला परवानगी. या चार गोष्टी अजून किती दूर आहेत, हे पाहिले म्हणजे दु:ख होते, वेदना होतात.

दिल्लीला महात्माजी म्हणाले, 'एक दिवसही स्वतंत्र हिंदुस्थान आर्थिक विषमता सहन करणार नाही.' परंतु आज काय दिसते? शेतकऱ्याला दिलीत जमीन? काटकसर करून विकत घे, असे सांगणे म्हणजे सर्वोदयी श्रद्धा नव्हे. शेतमजुराजवळ मालकीची जमीन नाही. त्याच्याजवळ दोनचार बिघे जमीन विकत घेण्याइतके पैसे कधीही साठणार नाहीत. चलनवाढीची सबब न सांगता जमीनमालकाला दीर्घ मुदतीची सेव्हिंग्ज सर्टिफिकिट द्या आणि शेतमजुराला जमीन द्या. कानावर आले की कोणी कॉंग्रेसचे बडे अधिकारी म्हणाले, 'पुढच्या निवडणुकीनंतर हे करावयचेच आहे; तुमच्या पुढच्या निवडणुकीसाठी आज या लोकांना असेच सडत पिचत ठेवणार होय? गरिबांच्या चितेची होळी पेटत ठेवून त्यावर भावी निवडणुकांची भाकर भाजणार? दुसऱ्यांना सत्तालोलुप म्हणणाऱ्या या लोकांची ही सत्ता टिकविण्याची कारस्थाने पाहिली की किळस येते !

जो प्रकार शेतकऱ्यांच्या बाबतीत तोच कामगारांच्या बाबतीत. 'उत्पादन वाढवा, उत्पादन वाढवा' म्हणून त्यांना येता जाता सारे डोस पाजत आहेत. कोट्यावधींचा नफा उकळणाऱ्या मालकांसाठी का अधिक उत्पादन करायचे? ज्या कारखान्यात आपण श्रमतो, तेथील माल जनतेच्या कल्याणार्थ आहे, जनता पिळली जाणार नाही, काळे बाजार होणार नाहीत, तेथील नफा धनवंतांच्या विलासात, दगडी राजवाड्यात उधळला जाणार नाही, ही खात्री वाटली, तर कामगार आनंदाने

नगर वाचनालय सातारा.
बाल विभाग

नाचत वाटेल तितका श्रमेल; परंतु जोवर गरिबांची होते होळी, बड्यांची पिकते पाळी, हे त्याला दिसत आहे, तोवर त्याचा जीव अधिक उत्पादनात संपूर्णतया कसा रंगेल? एवंच आर्थिक समता दूर आहे.

आणि सामाजिक समता? जोवर शिक्षणाने, राहणीने, संस्कृतीने सारे थर समान पातळीवर येत नाहीत, तोवर सामाजिक विषमता तरी कशी दूर होणार? साऱ्या जातीपाती समान माना म्हणून म्हटले, तरी जिच्या केसाला तेल नाही, जिचे नेसू चिंधी अशी कातकरीण स्वच्छ इरकली पातळ नेसलेल्या, वेणीफणी केलेल्या भगिनीजवळ कशी बसणार? तिला बसू कोण देणार? बिहारमध्ये चंपारण्यात गांधीजी गेले. कस्तूरबांना म्हणाले, 'भगिनींना स्वच्छता शिकव.' एक भगिनी कस्तूरबांना म्हणाली, 'आंग धुतले तर दुसरे नेसू काय?.' सामाजिक विषमता नष्ट करायलाही आर्थिक विषमता दूर करायला लागते. धार्मिक विषमता दूर करण्यासाठी सर्व धर्मातील चांगल्या गोष्टींचा प्रचार करणे, कोणत्याही धर्माचा असो, तो लायक असेल तर त्याला कामावर घेणे, भेदभाव न करणे या गोष्टी हव्यात.

स्वराज्यातील चौथी महत्वाची गोष्ट म्हणजे अहिंसक रितीने सरकारला विरोध दाखवण्याची मोकळीक असणे. गांधीजी म्हणत, 'आय ॲम द ग्रेटेस्ट डेमोक्रॅट - मी सर्वात मोठा लोकशाहीचा पुरस्कर्ता आहे.' परंतु आज काय आहे? सरकार लोकशाहीचे पुरस्कर्ते असते तर येता जाता कार्यकर्त्यांना अटक ना करते, त्याच्या मार्गात अडचणी ना आणते. परंतु सेवादलाचे 'बिजली नाचेल गगनात' हे सुंदर नृत्यगीत पाहून एका मंत्र्याने म्हणे कपाळाला आठ्या घातल्या! 'सेवादलात गाणे कशायाला?' असे म्हणाले! पू. विनोबाजींनी धुळ्याला सेवादलाच्या कलापथकाचा कार्यक्रम पाहून संतोष दर्शविला व 'खेड्यापाड्यात जा असे कार्यक्रम करत' असे सांगितले.

केवळ कायद्याने जनतेची हृदये का मिळत असतात? दुसऱ्या पक्षाला विधायक सेवाही करू द्यायची नाही! त्यांच्या नावावर सेवेचे भांडवल उगाच जमा व्हायला नको. 'आमच्या प्रौढ साक्षरता वर्गांना मंजुरी मिळत नाही मग मदत कोठून मिळणार?' असे एक कार्यकर्ता म्हणाला.

बर्नाड शॉने एके ठिकाणी सत्ताधाऱ्यांना उद्देशून म्हटले आहे- 'इफ यू वॉन्ट ब्लड यू वुइल हॅव इट. हॅव युवर ओन चॉइस- तुम्हाला रक्ताचेच डोहाळे हवे असतील तर तीही तुमची इच्छा पूर्ण होईल!' रक्तपात नको असेल तर त्वरेने जनतेचा संसार नीट उभा करायला हवा.

दरिद्रनारायणा, तुला सुखवणारे स्वराज्य दूर आहे. ते जवळ यावे म्हणून निर्मळपणाने जे संघटना करू पाहतात, जे लोकशाही मार्गाने जाऊ इच्छितात, त्यांच्या वाटेत निखारे पेरले जात आहेत. परंतु गांधीजींनी दिलेली श्रद्धा घेऊन आपण जाऊ. जय की पराजय हा सवाल नसून, सारे सहन करत न दमता, न थकता उत्कटपणे काम करणे एवढेच आपल्या हाती.

साधना : फेब्रु. ५, १९४९

२. सर्वांना नम्र प्रार्थना

नागरिक स्वातंत्र्य अबाधित राहिलेच पाहिजे, या संबंधी माझ्या मनात विचार खेळत असतात. अनेकांच्या मनात येत असतील. स्वातंत्र्यानंतर काहीतरी महत्वाचे फेरफार होतील, अशी आशा मला होती; पण ती आशा वेडी ठरली. जनतेत आपण आपला कार्यक्रम फैलावला पाहिजे. प्रचार करत राहिले पाहिजे. प्रचार करता करताही शेतकरी-कामगार यांच्या अनेक दुःखांची दाद लावण्याचे प्रयत्न करत राहिले पाहिजे. मला एक वाटते की, एकदा परसत्ता गेल्यावर या देशात लोकशाही मार्गाने जाण्याचे सार्वभौम बंधन सर्वांनी मान्य केले पाहिजे.

१) हे राष्ट्र उरलेले तरी अखंड असू दे.

२) हे राष्ट्र जातिधर्मनिरपेक्ष असू दे.

३) प्रचार लोकशाहीची, अहिंसेची बंधने पत्करून केला जाऊ दे.

ही तीन बंधने स्वीकारूनच सर्वांनी जावे.

हे राष्ट्र हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, पारशी सर्वांचे आहे. सर्व धर्मांना हे नांदवील. शेकडो वर्षे अनेक धर्म येथे नांदत आले. भारतवर्ष ती थोर परंपरा चालवील. ही दृष्टी आपण सर्वांनी घ्यायला हवी आणि दुसरी गोष्ट म्हणजे विरोध करायचा तो अहिंसक असावा. विरोधी लोकांना, विरोधी पक्षांना ठोकून काढायचे

ही वृत्ती नको. सरकारला हिंसक विरोध करू नये, परंतु ही बंधने देशातील कोण प्रामाणिकपणे पाळायला तयार आहे?

संप, सत्याग्रह यांना अहिंसेत स्थान आहे. हे शेवटचे मार्ग असले, अखेरचे उपाय असले, तरी अहिंसेत त्याचा समावेश होऊ शकतो.

देशात पक्ष आहेत त्यांनी आपली भूमिका निर्विवाद मांडावी. प्रामाणिकपणे मांडावी. या देशात थोडातरी प्रामाणिकपणा असो. येता जाता गनिमी काव्याची जरूरी नाही. त्याने राष्ट्र अध:पतित होते. स्वराज्यात आपल्या ध्येयानुसार, कल्पनेनुसार अनेक पक्ष निघतील. परंतु जे आज आपले राष्ट्र आहे ते अखंड असावे, तेथे लोकशाही असावी, हे राष्ट्र सर्वांचे असावे, अहिंसक रीतीने सर्वांनी जावे, अशी बंधने सर्वांनी घालून घेतली पाहिजेत असे वाटते.

कम्युनिष्टांचे दहशतवादी धोरण असते. ते जातात तेथे दहशत निर्माण करतात. सरकारजवळ अहिंसक सेना असती, तर गोळीबार होता ना. जनता धान्य नेऊ देत नव्हती, तर त्या दिवशी कार्यक्रम थांबवता आला असता. आमदारांना, मंत्र्यांना तेथे बोलावून जनतेची समजूत घालून धान्य मागून हलवता आले असते. परंतु नोकरशाही ती जुनीच. अभिमानी नि अहंकारी. अधिकारप्रिय नि अविवेकी. काही कार्यकर्ते म्हणाले, 'ज्यांनी स्वातंत्र्याच्या लढ्यात छळले त्यांचीच आज चलती आहे आणि लढणारे दारिद्र्यात खितपत पडले आहेत!' प्राण ही पवित्र वस्तू आहे. गोळीबार करणे ही मामुली गोष्ट नाही.

हे सर्व लिहित असताना अपार दु:ख होते. देशात गरिबांचे राज्य यावे ही गोष्ट खरी. ज्याला जमीन नाही त्याला जमीन मिळू दे. मोठे कारखाने राष्ट्राचे करा. काळेबाजार बंद करा. कंट्रोल भावाने सारे मिळेल असे करा.

सरकारला हात जोडून सांगणे की तुमच्याशी आर्थिक बाबतीत मतभेद असले, तरी जे लोक विधायक कामात भाग घेत आहेत तेही राष्ट्रसेवकच माना.

हे सारे लिहायचा एका अर्थी मला अधिकार नाही. मी कोण, कुठला? तरीही राहवेना म्हणून हृदय ओतले आहे. सर्व पक्षात माझे मित्र आहेत. सर्वांचे स्मरण मला होते. सर्वांच्या मंगलासाठी मी मनात प्रार्थना करतो. कर्तव्य कठोर असते.

तेही सारे मित्र कठोर कर्तव्य म्हणूनच आपापल्या आजच्या धोरणांनी जात असतील. ठीक. महाराष्ट्रातील तरूणांनी तरी आणखी गंभीर विचार करून मग आपली श्रद्धा निर्धारावी.

सर्वांना नम्र प्रार्थना की, या देशात तरी इतरांपेक्षा निराळ्या मार्गाने सामाजिक, आर्थिक क्रांती येवो. दहशतवाद नको. लोकशाही मार्गाने चला. भारताचा जो भाग राहिला आहे, त्याचे आणखी तुकडे पाडून तेथे निराळी राज्य स्थापायची नीति नको. निर्मळ साधनांनी, लोकशाही मार्गाने, संयम पाळून या प्राचीन पुण्यभूमी.ा वैयक्तिक स्वातंत्र्यासही योग्य तो वाव देणारा लोकशाही समाजवाद आपण आणू या. सर्वांचा संसार सुखाचा करायचा हा एक मार्ग आहे, असे जगाला सांगू या. बुद्धाच्या, महात्माजींच्या,संतांच्या, अद्वैताच्या या भूमीत तरी निराळ्या शिवतम मार्गाने आपण गेलो तर किती सुंदर होईल! प्रभू करो नि भारताला तरी मंगलमय मार्गाने नेवो.

साधना : एप्रिल ९, १९४९

३. जीवनाची आशा

देश स्वतत्र झाला. स्वतंत्र भारत आता लोकशाही मार्गाने समाजवादी ध्येय प्राप्त करून घेईल अशी कोट्यावधी भारतीयांना आशा वाटत आहे. हे ध्येय जास्तीत जास्त लौकर प्राप्त होण्यातच देशाचे कल्याण आहे. आंतरराष्ट्रीय शांती राहण्यासही भारताने त्वरेने समाजवादी ध्येय गाठणे अत्यंतिक जरूरीचे आहे. स्वतंत्र राष्ट्रात अहिंसेचे व्यापक बंधन पत्करून आपापल्या मतांची नि योजनांची सर्वत्र प्रसिद्धी करायला सर्वांनाच वाव हवा. मोकळीक हवी, तरच लोकशाहीचा आत्मा जिवंत राहील.

देशात लोकशाहीचे तत्वज्ञान तेव्हाच दृढमूल होईल, जेव्हा आपण आपापल्या मतांचा अति अभिनिवेश बाळगणार नाही. याचा अर्थ आपल्या मतांविषयी आपणास श्रद्धा नको असा नाही; परंतू सत्य समजणे कठीण आहे. मी माझ्या श्रद्धेप्रमाणे जावे, परंतु तोच एक सत्याचा मार्ग असे मी कसे म्हणू? कदाचित उद्या माझीही चूक मला कळेल आणि मी निराळा मार्ग घेईन. म्हणून मी माझे मन मोकळे करायला हवे. जीवन-प्रकाश घ्यायला सदैव ते तयार असायला पाहिजे. 'बुद्धेः फलमनाग्रहः' असे वचन आहे. तुमच्या जवळही बुद्धी आहे, विचार करायची शक्ती आहे,हे कशावरून ठरवायचे? तुम्ही आग्रही नसाल, हट्टी नसाल तर. सत्याचा संपूर्ण ठेवा जणू आपणासच सापडला, अशी भावना विचारी मनुष्य

... वाचनालय सातारा.
बाल विभाग

कधी करू शकणार नाही. तो आपल्या श्रद्धेप्रमाणे जाईल; परंतु त्या श्रद्धेप्रमाणे न जाणाऱ्याचा तो खून करणार नाही. त्याचा आत्यन्तिक द्वेष तो करणार नाही. त्याचे करणे आज तरी मला चुकीचे वाटते, असे फार तर तो म्हणेल.

गांधीजीसारख्यांची या देशात हत्या झाली. याचे कारण काय? आपण सर्वांनी या घटनेचा गंभीर विचार केला पाहिजे. मताचा अभिनिवेश हाच या गोष्टीच्या मुळाशी नाही का? मला वाटते तेच सत्य, बाकीचे सारे चूक, एवढेच नव्हे, तर राष्ट्राला ते खड्डयात लोटत आहेत, म्हणून त्यांना दूर केले पाहिजे, ही स्वतःच्या मताची आत्यन्तिक आग्रही वृत्तीच या खूनाला प्रवृत्त करती झाली.

कम्युनिस्टांचे आजकालचे तत्वज्ञान 'आम्हीच अचूक' या समजूतीवर उभारलेले आहे. रशियातील स्टॅलिनची कारकीर्द रक्ताने माखलेली आहे. जो जो विरोधी तो तो दूर केला गेला. अपार छळ त्यांचे झाले. नाझी लोकच क्रुर होते असे नाही. रशियातील तुरूंगातूनही जे लाखो जीव संशयावरून ठेवले जातात, ते ज्यांना शक्य झाले त्यांनी स्वानुभवाने लिहिले आहे. पूर्वी ख्रिस्ती लोकही धर्माचा असाच प्रचार करत. प्रत्यक्ष ख्रिस्ती धर्मातही कॅथलिक किंवा प्रॉटेस्टंट यांनी एकमेकांचा का कमी छळ केला? मुसलमानी धर्माचा काही प्रचार 'कुराणातच सारे सत्य आहे, ते माना नाहीतर मान उडवतो,' या अभिनिवेशानेच झालेला आहे.

हे जुलूम का केले जातात? मनुष्य इतका निर्दय, कठोर कसा होतो? माझ्याजवळ जे आहे तेच सत्य असल्यामुळे, त्याच्या आड जो जो येईल तो उडवलाच पाहिजे, ही आसुरी वृत्ती त्यातून जन्मते. माझ्या सत्याला विरोध करायला कोणी उभा राहता कामा नये, यासाठी सर्वांना दहशत बसवावी असे त्यांना वाटते. नाझी लोकांना वाटे 'जर्मन वंशच श्रेष्ठ, बाकीचे मानव म्हणजे केरकचरा, त्यांना जाळले काय, छळले काय, काय बिघडले?' कम्युनिष्टांना वाटते, आम्हीच जगाचे उद्धारकर्ते. दुसऱ्यांजवळ सत्य नाही. आमचा मार्ग म्हणजे मानवी सुखाचा, विकासाचा. त्या मार्गात जे जे आड येतील ते वाटेल त्या रीतीने नष्ट करणे हेच योग्य.' अशा वृत्तीमुळे कम्युनिस्टी छळबुद्धी आणि खूनी वृत्ती जन्मली. संघाच्या लोकांना असेच वाटे आणि अखेर महात्माजींचा वधही अशाच प्रवृत्तीतून झाला

एकदा मीच खरा हा अंहकार जडला की त्याच्यामागून अंधता, निर्दयता सारे काही येते.

जैन हे अहिंसाधर्मांचे उपासक. स्याद्वादाचा त्यांचा सिद्धान्त 'इदमूपिस्यात्' हेही असू शकेल- असे ते म्हणत. स्वतःचे मत मांडताना, त्याची सत्यता स्थापताना दुसरीही बाजू असू शकेल. अशी अनाग्राही वृत्ती या स्याद्वादात आहे. स्याद्वाद म्हणजे संशयात्मा नव्हे. मला या क्षणी जे सत्य वाटते ते मी घेऊन जावे; त्याला विरोध करणाऱ्यांची मी चटणी नाही उडवता कामा. कारण कदाचित् उद्या मला सत्य वाटणारी गोष्ट चुकीची ठरू शकेल. अशी वृत्ती समाजात राहील तर समाजात अहिंसा राहील. हिंदुस्थानात नाना दर्शने, नाना तत्वज्ञाने जन्मली; परंतु कोणी कोणाला छळले नाही, जाळले नाही, पोळले नाही. चार्वाकवादी आपले मत मांडत आहेत. अद्वैती आपले तत्वज्ञान मांडत आहेत. आपापली मते मांडा. जनतेला जे पटेल ते जनता घेईल. अशानेच सत्याची पुजा होईल. सत्य का तलवारीने शिकावयाचे असते? जेथ संकुचितपणा असेल तेथून सत्य निघून जाते. अहंकाराजवळ कोठले सत्य? महात्माजी नेहमी म्हणत, 'मला पटवा. माझी चुक दिसली तर मी निराळा मार्ग घेईन.' ते स्वतःच्या श्रद्धेने जात होते. ती श्रद्धा अचल होती, परंतु सदैव नवीन घ्यायला ते सिद्ध असत.

श्रीकृष्णमूर्ती एकदा म्हणाले, 'ट्रूथ कॅन नेव्हर बी ऑर्गनाइजड्- सत्याची संघटना नाही करता येत.' विनोबाजी हेच म्हणाले होते. तुरूंगातून सुटून आल्यावर ते महात्माजींना म्हणाले, 'मला कोठे अध्यक्ष, चिटणीस नका नेमू. हे घ्या राजीनामे.'

महात्माजींनी विचारले,'परंतू काम करणार आहेस ना?'

ते म्हणाले, 'हो.'

महात्माजी म्हणाले, 'मग दे तुझे राजीनामे.'

संघटना बांधली की थोडा तरी अभिनिवेश येतोच. माझाच पक्ष खरा, माझीच संघटना सत्यावर उभी, असे मग मला वाटते. सत्य तर सुर्यप्रकाशाप्रमाणेच मोकळे हवे, वाऱ्याप्रमाणे सर्वगामी हवे; तरच ते सतेज, निर्मळ, प्राणमय राहील.

संकुचितपणा सत्याला मानवणार नाही. अहंकार मानवणार नाही. राजकीय नेत्यांच्या ठिकाणी असा दैवी गुण भाग्यानेच आढळतो. गांधीजींनी या राष्ट्राला, जगाला दिलेली ती शिकवण आहे. आपल्या निर्णयाची सत्यता स्वत:ला पटत असूनही दुसऱ्याविषयी सद्भाव ठेवणे ही अहिंसा. यातच लोकशाहीचा आत्मा. महात्माजींनी आमरण ही गोष्ट कृतीने शिकविली. भारतीय संस्कृतीतच ही गोष्ट आहे.

संघटनेमुळे, पक्षामुळे अंधता येते; जडता म्हणजे मीच खरा ही वृत्ती येते, अभिनिवेश येतो, सत्य गुदमरते, हे सारे खरे; परंतु जगात कार्य करायचे तर काही संघटना लागते. विवेकानंद एके ठिकाणी म्हणतात, 'जगात कार्य करायचे तर थोडा अहंकारही लागतो.' परंतु थोडा अहंकार म्हणजे अहंकाराचा पुंज नव्हे. लोकमान्य एकदा म्हणाले की 'स्वराज्य खोटे बोलून येणार असेल तर मी खोटेही बोलेन.' यांतील 'ही' शद्ब महत्वाचा आहे. आता अगदी माझ्या खोटे न बोलल्यामुळेच अडत असेल तर बोलतो बाबा. म्हणजे तो 'ही' दु:खच दर्शवतो.

खोटे बोलणे वाईटच, परंतु आलीच वेळ तर तेही करीन. परंतु लोक 'ही' विसरून गेले आणि लोकमान्यही म्हणत की स्वराज्यासाठी खोटे बोलले, म्हणून काय झाले, राजकारणात हे चालायचेच, असा अर्थ करू लागले! विवेकानंदांच्या वरील म्हणण्याचाही असा अर्थ कोणी करतील. परंतु विवेकानंद 'थोडा अहंकार' म्हणतात. आपापले पक्ष करा, संघटना करा. आपण बरोबर आहोत ही श्रद्धा ठेवून, हा थोडा अहंकार ठेवून काम करा; पण अहंकार फाजील झाला की दुसऱ्या पक्षाचे नि:संतान करायला निघाल, म्हणून जपा. गांधीजींनीही संघटनेचा आश्रय करूनच प्रयोग केले. कॉंग्रस संघटनेद्वारा त्यांनी काम केले. इतरही अनेक संस्था त्यांनी काढल्या, परंतु त्यांची स्वत:ची विशिष्ट श्रद्धा असूनही ते मोकळे असत. 'मला पटवा' असे ते म्हणत. सर्वांस ते असेच सांगत.

आपण मानव अपूर्ण आहोत. संपूर्ण सत्य आपणास मिळणे कठीण. त्याचप्रमाणे मिळालेल्या श्रद्धेनुसार अहंकाररहित होऊन जाणेही कठीण; परंतु प्रयत्न करावा, त्यादिशेने जावे. आपापल्या विचारांचा, कल्पनांचा प्रचार करा, त्या पटवा.

त्यासाठी हाणामारीची, तुमच्या शस्त्रास्त्रांची जरूर नाही. सत्य प्राणमय असेल तर जगात विजयी होईल. सत्य जर सत्तेवर अवलंबून असेल, आत्मा ॲटमबाँबवर अवलंबून असेल, तर सत्ता, ॲटमबाँब म्हणजेच विश्वाचे आदितत्व वा अंतिम तत्व असे म्हणावे लागेल आणि तसे असेल तर जीवनाला आशा तरी कोणती?

साधना : मे १९४९

◘

४. या राष्ट्राचे कसे काय व्हायचे ?

भारतवर्ष जगाला मार्गदर्शन करील, भारताकडे जगाचे डोळे आहेत, इत्यादी आत्मगौरवपर वक्तव्ये नि मंतव्ये आम्ही करीत असतो; परंतु वस्तुस्थिती पाहिली तर जगातील कदाचित सर्वांहून हतपतित राष्ट्र आपण असू असे वाटते. ही भारतभूमी एकेकाळी सत्यासाठी विश्वविख्यात होती. स्वप्नातील शद्ब पाळणारे, सत्यासाठी बारा बारा वर्षे वनवास भोगणारे सत्वशील राजे येथे झाले. येथे दिलेल्या शद्बाचे केवढे महत्व! भीष्म, शिबी, श्रियाळ, कर्ण केवढाली नावे! प्रतिज्ञापालनाचा केवढा महिमा! येथे आलेल्या प्रवासी लेखकांनी लिहून ठेवले आहे की, 'हिंदूस्थानात दाराला कडीकुलूप लावण्याची जरूरी पडत नाही. पराकाष्टेचा प्रामाणिकपणा येथे आहे. सत्याची येथे नितांत कदर आहे!'

असा हा हिंदुस्थान! सत्य-अहिंसेला पुन्हा जगात सिंहासनावर स्थापू पाहणारे महात्माजी येथे झाले; परंतु त्या महापुरूषाला हिंदी जनतेच्या हृदयावर सत्य नि अहिंसा यांचा खोल ठसा उमटवता आला नाही असेच म्हणावे लागते! अहिंसेहूनही गांधीजी सत्याला महत्व देत. ते एकदा म्हणाले होते, 'खून करून रक्ताने माखलेल्या हातांनी कोणी मजकडे आला; परंतु त्याने प्रामाणिकपणे सारे कबूल केले, तर त्यालाही मी जवळ करीन; परंतु असत्य बोलणाऱ्याला मी सहन करू शकणार नाही.' सत्य म्हणजे जीवनाची प्रतिमा. उपनिषदात सत्याचा अपार महिमा आहे.

सत्य म्हणजे परमात्मा. धर्मराजाचा रथ चार बोटे उंच चालवयाचा परंतु ‘नरो वा कुंजरो वा’ करताच तो एकदम खाली आला!

परंतु सत्यपूजेसाठी प्रसिद्ध असलेली ही प्राचीन पुण्यभूमी आज सत्याला सर्वस्वी पारखी झालेली आहे. वरपासून खालपर्यंत सारे राष्ट्र पोखरल्यागत झाले आहे. आमच्या देशातून ज्या ज्या देशात माल जातो, ते ते देश माल चांगला नसतो, आत घाण असते, तुमच्या कंपन्या फसवतात, अशा तक्रारी पाठवतात. ‘भारताचा नैतिक वारसा’ म्हणून तुम्ही आम्ही, लहानमोठे, सारेच गौरवाने बोलत असतो. परंतु कोठे आहे तो नैतिक वारसा? कोठे आहे ती भारताची आध्यात्मिक संपत्ती? कोठे आहे ते गुणांचे अपार वैभव?

भारताची ती खरी संपत्ती होती. सुवर्णाला सुवर्णभूमीत आम्ही मान दिला नाही. राजेमहाराजे मोठमोठी राज्ये, साम्राज्ये तृणवत फेकून गंगातिरी तपस्या करायला जात. मोठमोठे सम्राट लंगोट्या शुक्राचार्यांच्या चरणावर आपली मुकुटमंडित मस्तके ठेवीत. या देशात सत्याचा महिमा होता, सद्‌गुणांचा गौरव गायिला जाई. कोठे आहे ती भारतीय उदात्तता?

मोठमोठे कारखानदार, मोठमोठ्या कंपन्या, यांना या देशाचे नांव कलंकित होऊ नये म्हणून काहीच वाटत नाही का? ज्या देशात राम-कृष्ण झाले, बुद्ध-महावीर झाले, त्या देशाचे नांव कलंकित करताना काही वाटत नाही? दहा हजार वर्षांच्या भव्य परंपरेला दोन दिडक्या मिळाव्या म्हणून काळिमा फासायला आपण तयार होतो? परराष्ट्रांना फसवतो, स्वराष्ट्राला फसवतो? सरकारला प्राप्तीवरचा कर प्रामाणिकपणे कोण देतो?

कारखानदार, कंपन्या, व्यापारी यांची ही दशा, तर सार्वजनिक संस्थाही अशाच सडलेल्या. परवा मुंबईत घर पडले. दोन-तीन माणसेही दगावली म्हणतात. मी तेथे जवळच होतो. मी म्हटले, ‘काही काही घरे फारच जुनाट झाली आहेत. पावसाळ्यात आता ही पडतील. म्युनिसिपालिटी यांना सांगत का नाही? घरे पडेपर्यंत मालक भाडे घेणार? प्राणाचेही मोल शेवटी घेणार का?’ तर जवळचे एक सद्‌गृहस्थ म्हणाले, ‘म्युनिसिपालिटीने जरी मालकाला अमुक दुरुस्ती करा वगैरे

कळवले, तरी दहा रूपये दिले की दुरूस्ती झाल्याचे सर्टिफिकेटही मिळू शकते!' ते गृहस्थ मजकडे बघून रागाने म्हणाले, 'जेथे वाटेल तो मनुष्य विकत घेता येतो असा हिंदुस्थानच असेल!' माझ्या डोळ्यात पाणी आले. भारताविषयी मला किती प्रेम नि भक्ती! नाशिकच्या तुरूंगात असताना आम्ही बगीच्या कामाला गेलो की मी हळूच तेथील माती माझ्या कपाळी लावायचो. त्यावेळेस मी पुढील चरण मनात गुणगुणे-

नगर वाचनालय सातारा
बाल विभाग

तुझ्या धूलिमाजी वाटे लोळणे सुखाचे
इथे पाय पावन फिरले राम-जानकीचे

त्या भारतभूमीची का अशी अवनत दशा व्हावी? महात्माजींचा ना हा देश?

परवा खेडेगावातला एक मित्र आला होता. आम्ही बोलत होतो. तो म्हणाला, 'गुरूजी, या देशाचे कसे व्हायचे? मोठेही खोटे बोलणारे आणि खालची जनताही तशीच! कोणी शेतीसाठी म्हणून तगाई घेतो, परंतु शेतीचे उत्पन्न वाढावे म्हणून तिचा विनियोग होईल तर शपथ! बैलांसाठी म्हणून सरकार कर्ज देते, परंतु बैल विकत घेतले जात नाहीत. कोणी शेतीसाठी खते मिळवतात आणि मग त्याचा काळाबाजार करतात. विहिरीसाठी पैसे घेतात नि ते लग्नात खर्च केले जातात. शेतीच्या इंजिनासाठी खानदेशकडे काहींनी पैसे घेतले, परंतु यातून त्या राष्ट्राला मोबदला काय मिळणार? अन्नोत्पादन वाढावे, या देशाला भाकरीसाठी तरी दुसऱ्याच्या तोंडाकडे बघण्याची पाळी येऊ नये, असे कुणाला वाटत आहे? देशाची, समाजाची भावनाच नाही. स्वार्थ हा सर्वांचा धर्म आहे. मग तो बावळट, भोळा समजला जाणारा शेतकरी असो वा जगाशी आयात-निर्यात करणारा बडा व्यापारी असो!' मी ऐकत होतो. शेवटी मी डोळे मिटून पडून राहिलो. मला ते बोलणे ऐकवेना. हे राष्ट्र इतके सत्वशून्य कसे, याचे मला राहून राहून वाईट वाटत होते.

ज्यांच्यावर उद्याची भिस्त तो विद्यार्थी व तरूणवर्ग, त्यांच्यात तरी सत्यनिष्ठा आहे का? तर कळले मुंबईच्या अमेरिकन लायब्ररीतून अनेक ग्रंथ नाहीसे होतात. तेथील फळ्यावर वार्ताफलकावर 'अमूक ग्रंथ नाहीसे झाले आहेत, कृपा करून आणून द्या' अशी पत्रके असतात! काय त्या चालकास वाटत असेल? जगाला

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

आम्ही नितिपाठ शिकवू पाहातो; परंतु आमची तर ही दशा! इतर देशातून आमच्या विद्यार्थ्यांनी अशीच अपकिर्ती मिळविल्याचे ऐकले होते. पुस्तकांची पाने फाडणे, चित्रे फाडणे याचे आम्हाला काहीही वाटत नाही. सार्वजनिक वस्तूंचे पावित्र्य ही चीजच आम्हाला कळेनाशी झाली आहे. सारा तरूणवर्ग असाच आहे असे मी कसे म्हणू? परंतु सत्याची चाड कमी, ही गोष्ट खरी.

ज्या देशाला लोकशाही मार्गाने जावयाचे आहे, त्याला सद्गुणांची जोपासना करण्यावाचून गत्यंतर नाही. तुम्ही दुर्गुणी व्हाल तर तुमच्यातून कोणी हडेलहप्पी हुकुमशहाच उद्या निर्माण होईल. स्वातंत्र्यास तुम्ही नालायक ठराल. जेथे संयमी, विवेकी, सत्यनिष्ठ, प्रामाणिक लोक असतील; श्रमणारे, दुसऱ्याची कदर करणारे लोक असतील, तेथे लोकशाही वाढेल. तेथे व्यक्तिस्वातंत्र्य नीट नांदू शकेल. परंतु जेथे दुसऱ्याचा विचारच नाही तेथे फटके मारणाराच उद्या उभा राहणार! तुमची जी लायकी तसे सरकार तुम्हाला मिळते.

मी म्हणजे भारत, मी म्हणजे मानवजात. माझा शद्ब, माझा आचार, माझा विचार असा नसो की जेणे करून भारताची मान खाली होईल, मानवजातीच्या मुल्यांची हानी होईल. मी भारताचा, एवढेच नव्हे तर मानवजातीचा घटक आहे. ही दहा हजार वर्षांची मानवजातीची परंपरा. तिचा मीही प्रतिनिधि आहे. ही विशाल कल्पना पदोपदी मनात आणून वागू तर आचार बदलेल, विचार बदलेल. जीवन अंतर्बाहय स्वच्छ नि सुंदर होईल. नवभारताला या दृष्टीची जरूरी आहे. तुम्ही शहरात असा वा खेड्यात असा, कारखान्यात असा की कचेरीत जाणारे असा, आपल्याकडून सत्याची पायमल्ली होणार नाही याची काळजी सर्वांनी घ्यावी. सार्वजनिक पैसा, त्याचा नीट हिशेब देता आला पाहिजे. रामकृष्ण परमहंस म्हणत, 'व्यवहार व परमार्थ दोन्ही ठिकाणी चोखपणा हवा.' ज्या राष्ट्राचा सार्वजनिक व्यवहार चोख असेल त्याला आशा आहे. सार्वजनिक जीवन जर येथे पै किंमतीचे झाले असेल, तर या राष्ट्राला कोणती आशा?

साधना : जून ११, १९४९

५. संयम नि सहानुभूती

प्रचंड इमारत उभारण्यात येत असते तेव्हा आपल्याला काय दिसते? गवंडी दगडांना इकडे तिकडे कापीत, छाटीत असतो. मगच त्यांना त्या भव्य इमारतीत जागा मिळते. ज्याप्रमाणे दगडविटा सारख्या करून, त्यांची पुढे आलेली टोके काढून छाटून घ्यावी लागतात, त्याचप्रमाणे दगडादगडांच्यामध्ये, विटाविटांमध्ये सिमेंटही भरावे लागते, चुना लागतो. प्राचीन इमारती अजून भक्कम आढळतात. म्हणतात की, चुन्यात गुळही घालीत असत.

आज स्वतंत्र भारताची टोलेजंग इमारत उभारायची आहे. भाषावार प्रांतरचना पूर्वीच मंजूर झालेली आहे; परंतु अशी रचना केली जात असता द्वेष, मत्सर न फैलावोत. परस्पर प्रेम राहो, सहकार्य राहो. भारताचे एक हृदय आहे ही जाणीव सर्वांना असो. परमेश्वराला सहस्त्र-हृदय, सहस्त्राक्ष अशी विशेषणे आपण देतो; परंतु सहस्त्र-हृदय असे विशेषण कधीच आढळत नाही. परमेश्वराला हृदय एकच, त्याप्रमाणे भारताचे प्रांत अनेक झाले तरी अंतःकरण एक असो.

भारताची एक संस्कृती आहे. प्रत्येक प्रांताची विशिष्ट अशी संस्कृती कोठे आहे? थोडेफार फरक असतील; परंतु तेवढ्याने ती भिन्न नाही होत. भारतातील प्रत्येक प्रांताची का भिन्न संस्कृती आहे? भारतीय संस्कृतीची ध्येये आपल्या संस्कृत ग्रंथातूनआहेत. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, स्मृति, पुराणे, दर्शने, यांतूनच आपणास ध्येये मिळाली. संस्कृतातीलच हे ध्येयघोष प्रांतीय भाषातून जनतेचे

कैवारी जे संतकवि त्यांनी दुमदुमवले. कृतिदासांचे रामायण बंगालीत, श्रीधरांचा रामविजय मराठीत, कंबनचे रामायण तामिळमध्ये, परंतु त्या त्या प्रांतातील जनतेला त्यांच्या त्यांच्या भाषेतून रामसीता, भरत-लक्ष्मण, हनुमान यांचे जे आदर्श मिळाले, ते का निरनिराळे आहेत? भगवान शंकराचार्य जन्मले केरळात; परंतु तो ज्ञानसुर्य हिंदुस्थानभर गेला. द्वारका, जगन्नाथपुरी, बदरीकेदार, शृंगेरी चारी दिशांना चार पीठे स्थापून संस्कृतीचे ऐक्य निर्माण करता झाला.

शंकराचार्यांच्या अद्वैताचा सुगंधच सर्व भारतीय भाषा साहित्याला येत आहे. तुकारामाच्या अभंगात, नरसी मेहताच्या भजनात, रविंद्रनाथांच्या गीतांजलीत, श्री बसवांच्या वचनांत, एकाच संस्कृतीची ध्येये दिसून येतील. भारतीय संतांनी आणि आचार्यांनी भारतीय संस्कृती एकरूप केली. नामदेवांचे अभंग शीखांच्या ग्रंथसाहेबात जातात. कबीराची गाणी नि दोहे, मीराबाईची उचंबळणारी गीते, गोपीचंदाची गाणी सर्व हिंदुस्थानभर गेली आहेत. दक्षिणेकडील यात्रेला उत्तरेकडील लोक येत उत्तरेकडील यात्रेला दक्षिणेकडील संस्कृतातून चर्चा चाले. तीच प्रांतीय भाषांतून मग जाई. अशा प्रकारे अखिल भारतीय संस्कृती जोपासली गेली. कमलाच्या अनेक पाकळ्या म्हणजे प्रांतीय संस्कृती. त्या अलग नाहीत.

कलकत्त्याला डॉ. काटजू गेले तेव्हा त्यांचे स्वागत करताना बंगाली पुढारी म्हणाले, 'बंगाली संस्कृती निराळी म्हणजे काय? तुमचे विवेकानंद, रामकृष्ण, विद्यासागर, बंकीम, रवींद्र, शरदबाबू यांनी का असे काही दिले, जे इतर प्रांतात नाही? जे इतर प्रांतांच्या परंपराहून फार निराळे आहे. आज प्रत्येक प्रांताला असे वाटू लागले आहे की, आपण इतरांहून अगदी वेगळे, निराळे. बाबांनो भाषा जरा निराळी बोलत असाल, परंतु आईच्या दुधाबरोबर एकच संस्कृती भारतीय मुलांना पाजली जात आहे हे विसरू नका.

१९३० मध्ये आम्ही मुंबई प्रांतातले राजबंदी त्रिचनापल्लीला पाठवले गेलो. सायंकाळी प्रार्थना झाल्यावर कोणी काही लिहून वाची. व्यंकटाचलम् म्हणून दक्षिणेतला एक राजबंदी माझा मित्र झाला होता. तो इंग्रजीत काही लिही. मी मराठीत अनुवादून वाची. त्याची भाषा मल्याळी. 'त्याने मलबारकडचा एक दिवस' म्हणून एक लेख लिहिला. मी त्याचे भाषांतर करून वाचले. 'सकाळी बायका

उठतात. चूल सारवतात. सडा, समार्जन करतात. मग कॉफी होते. आजीबाई भाजी चिरते. आजोबा पुजेला बसतात. सुना तळ्यावर धुणी घेऊन जातात.' असे ते वर्णन होते. ते ऐकल्यावर महाराष्ट्रीय मित्र म्हणाले, 'आपल्याकडच्यासारखेच आहे.' मी म्हटले, 'भारताचे हृदय एकच आहे. तेच प्रश्न, त्याच सामाजिक समस्या, हुंडे, स्पृश्याअस्पृश्यतातेच प्रकार. म्हणून मी म्हणतो की भारतीय संस्कृती एक आहे. प्रांताप्रांताच्या संस्कृती विशेष अलग अशा नाहीत.

परंतु एकदा कोठे शुद्धीच्या नांवावर हकालपट्टी सुरू झाली म्हणजे ती कोठे थांबेल ते सांगता येणार नाही. मराठीतून उर्दू शद्ब हाकला चळवळ सुरू झाली. नाना शद्बांच्या नाना छटा असतात. आकाश शद्ब आणि अस्मान शद्ब आपण एकत्र नाही घालणार; परंतु विवक्षित छटा दाखवायला अस्मान शद्ब सुंदर वाटतो. साऱ्या जगातून घ्यावे, पचवावे नि बलवान व्हावे. इंग्रजी कोशात राजा, सरदार, जंगल इत्यादी शद्ब आढळतील. शेकडो ठिकाणचे शद्ब त्यांनी घेतले. भाषाशुद्धीची चळवळ आणि प्रांतशुद्धीची चळवळ! हिंदूंनी मुसलमानाला हाकलावे, मुसलमानांनी हिंदू-शीखांना हाकलावे. एकमेकांची घाण जणू दूर काढावी, असे प्रकार सुरू झाले! परंतु मुसलमानांनी हिंदूशीखांना आणि हिंदूशीखांनी मुसलमानांना हाकल्यावर पुढे काय? हाकलायची तर गोडी वाटू लागली.

नगर वाचनालय सातारा
बाल विभाग

मग बंगाल्याने बिहारीला 'चलेजाव' म्हणावे, बिहारीने बंगाल्याला! तामिळ बंधूने तेलगू बंधूस, तेलगू बंधूने तामिळ बंधूस. कानडी बंधूंनी महाराष्ट्रीयांस, महाराष्ट्रीयांनी गुजरात्यास; असे का एकमेकांना खो देत राहायचे? आज हे प्रकार होत आहेत. श्री जयप्रकाश मद्रासच्या दौऱ्यावर असता, आम्हाला स्वतंत्र द्रविडिस्थान द्या, आर्यांनी आमचा नाश केला, आर्य भाषेतील शद्ब काढून टाका, अशा चाललेल्या चळवळी त्यांनी पाहिल्या. त्यांना दुःख झाले. कोठे आहे भारत? प्रत्येक प्रांत का स्वतंत्र होणार? हे असहिष्णू प्रकार कोण थांबवणार? आपणच याला आळा घालू या. आळा कशाने घालता येईल? परस्परांची भाषा अभ्यासून. एखादी तरी द्रविड भाषा आपल्याला आलीच पाहिजे; मातृभाषा आणि हिंदुस्थानी याशिवाय. जयप्रकाश मद्रासकडे हिंडताना आधी चार वाक्ये तामिळमध्ये बोलत. लोकांना आनंद होई. भाषा अहंकारासाठी नसून हृदयाला पोहोचण्यासाठी आहे.

सेनापती नि मी अस्पृश्यता निवारणार्थ हिंड्त असता गडहिंग्लजला गेलो. मला चिठ्ठी आली, 'गुरूजी कानडीत बोला.' मी म्हटले 'तुरूंगात वाचायला शिकलो बोलायला नाही.' सेनापतींना वाईट वाटले. आमची मोटार लॉरीसारखी जात होती. बरोबर सेवादल पथकात कुतूब होता. त्याला कानडी येई. सेनापती म्हणाले, 'बंधूभगिनींनो वगैरे मला कानडीत शिकव.' सेनापतींनी चार वाक्ये पाठ केली. पुढच्या सभेत, 'बांधव रे मत्तु भगिनी रे' त्यांनी म्हटले. टाळ्यांचा कडकडाट झाला. हृदयाला ते शब्द भिडले. विवेकानंद शिकागोला सर्वधर्मपरिषदेसाठी गेले. सारे प्रतिनिधी 'सभ्य नर-नारींनो' असा आरंभ करीत. विवेकानंद 'बंधूभगिनींनो' म्हणाले आणि टाळ्या थांबत ना! त्या दोन शब्दांनी त्यांनी सारी हृदये जिंकली. अशी ही मौज आहे. कानडी भाषा बोलत असले म्हणजे काय 'उंडुगुंडु' चालवले आहे म्हणू नये. गुजराथीला 'अमळो' असे हिणवू नये.ती ती भाषा कानावर पडली तर भावाची भाषा भेटली म्हणून नाचावे. थोडेथोडे शब्द येत असावेत, गाणी येत असावीत, आनंद वाटावा.

मी मुंबईस माटुंग्याच्या उडपी श्रीकृष्ण भुवन खानावळीत जातो. तेथेकानडी, तमिळ, तेलगू, मल्याळी सारे येतात. मला अपार आनंद होतो. भारतीय बंधूंचे दर्शन होते. मी देशभर कधी हिंडू-फिरू? मला मित्र महणतात, 'इतक्या लांब कशाला जाता?' तेथे मला माझा सारा प्यारा भारत भेटतो. हा आंनद त्यांना काय कळे? विनोबाजी एकदा म्हणाले, 'आकाशातील सप्तर्षी पाहून मला नकाशातील काश्मीर नि युक्तप्रांत आठवतात' जेथे जातो तेथे भारताचे भव्य दर्शन होते, असे भारतमय आपण होऊ या. हिमालय माझे डोके, विंध्याद्रि माझा कंबरपट्टा, पूर्व-पश्चिम तीरे माझे पाय. सर्व भारताच्या रूपाने मला नटू दे. साऱ्या भाषा माझ्या, सारे भाऊ माझे, माझे मोठे कुटुंब आहे. लाखांचे हे तुटपुंजे राष्ट्र नाही. कोट्यावधींचे ते आहे. मग मोठ्या कुटुंबावर जबाबदारी अधिक शिका दोनचार भाषा. प्रांतांच्या सीमेवरचे भान तर संगमाप्रमाणे तीर्थक्षेत्रे माना. ते इकडे का तिकडे भांडू नका.

प्रांतांनी भारती व्हावे आणि भारताने अति भारती व्हावे. महात्माजी उर्दू लिपी शिका म्हणत. अरे त्या महापुरूषाची दूरदृष्टी आहे तुमच्याजवळ? एकीकडे

आशियाचा संघ करा म्हणता. इजिप्त पासुन तमाम मुस्लिम राष्ट्रांची जी अरबी लिपी. फक्त तुर्कांनी रोमन लिपी घेतली. या सर्व देशांचे विचार कळायला त्यांची लिपी नको यायला ? त्या भाषा नको कळायला ? या सर्व मुस्लिम देशांचे राजकारण वा अर्थकारण अमेरिकेच्या वृत्तपत्रावरून का आपण वाचणार, समजून घेणार? हिंदू, मुस्लिम कोट्यावधी आहेतच. त्यांच्यासाठी शेजारधर्म म्हणून आणि आशियातील मुस्लिम राष्ट्रांचे हृद्गत कळावे म्हणून अरबी लिपी शिकणे आवश्यक आहे. युरोपातील लोक अनेक भाषा शिकतात. झेक राष्ट्रात हिंदीचे वर्ग चालतात. काय त्यांना जरूर?

म्हणून आपण क्षुद्र कुंपणे घालून बसता कामा नये. व्याप वाढवाल तर वैभव वाढेल. संकुचितता सोडा. सारे प्रांत प्रेमस्नेहाने एकमेकांजवळ वागोत. भारताचे एक हृदय असो. प्रांत एक जीवी असोत. आंतर भारती आणि विश्वभारती अशी आमची दोन ध्येये आहेत. ते थोर पूर्वज म्हणाले, 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' आपण सर्व शिवाला आर्य म्हणजे उदार, सुसंस्कृत करू. म्हणून चिनी भाषा शिकून त्या भाषेत आपल्या प्राचीन पंडितांनी ग्रंथ लिहिले. विनोबाजी अरबी शिकून मुसलमानांना कुराणचा महिमा आज सांगत आहेत. प्रांतांचा परस्पराशी आणि भारताशी प्राणमय संबंध, याला आपण आन्तरभारती ध्येये म्हणू. दुसरे रविंद्रनाथांनी उद्‌घोषिलेले विश्वभारतीचे. भारताचा सर्व जगाशी संबंध ठेवणे. असे हे संबंध नि सहानुभूती, विशाल व थोर दृष्टी ही असतील तरच निर्माण होतील.

साधना : ऑगस्ट १, १९४८

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

६. गांधीजींचे दशावतार

महात्माजींची जयंती आली. शांती आणण्यासाठी, जातीय ऐक्य निर्मिण्यासाठी ते झुंज देत होते. आज कोठे आहेत गांधीजी? कोठे आहेत बापू? त्यांना कोठे शोधायचे, कोठे बघायचे? ते आपल्याजवळच आहेत. गांधीजी चिरंजीव आहेत. ते अधिकच आपले झाले आहेत. त्यांचा आकार लोपला, परंतु त्यांचे विचार, त्यांची शिकवण यांना मरण नाही. उत्तरोत्तर त्यांचे हे वैचारिक जीवन, अनुभूतीचे ध्येयात्मक जीवन, सत्यप्रेमाने संपन्न असलेले जीवन अधिकच दैदिप्यमान होत जाईल.

अवतारी पुरूषांची आपण जयंती साजरी करतो. त्यांची पुण्यतिथी नाही साजरी करीत. रामनवमी, गोकुळअष्टमी साजरी करतो. परंतु संतांची, वीर पुरूषांची पुण्यतिथी साजरी करतो. दासनवमी, एकनाथषष्ठी, तुकारामद्वितीया आपण साजऱ्या करतो. श्री शिवछत्रपतींची पुण्यतिथी साजरी करतो. लोकमान्यांची करतो. गांधीजींचीच जयंती आपण साजरी करू लागलो. ते एक अपूर्व पुरूष होऊन गेले. गांधीजी अवतारी पुरूष. जीवनाच्या सर्व क्षेत्रात ते अवतरले. अवतार म्हणजे जो न्यायासाठी, सत्यासाठी दूर न राहता प्रत्यक्ष समाजात उतरून झगडतो. या दृष्टीने आपण थोरांना अवतार म्हणतो. महात्माजींनी अनेक क्षेत्रांत प्रकाश आणला. म्हणून मी त्यांना मनात दशावतारी म्हणतो. वास्तविक ते शतावतारी, अनंतावतारी आहेत.

ते विराट जीवनात वावरत होते. मार्गदर्शन करत होते. परंतु सुलभतेस्तव मी त्यांना दशावतारी म्हणतो.

बाल विभाग

त्यांचा पहिला अवतार सत्यअहिंसेचा. येथे सारी किल्ली, गुरूकिल्ली. महात्माजींचे महान जीवन म्हणजे या तत्त्वांचा विशाल अविष्कार. सत्य-अहिंसेतही सत्याला प्राधान्य. ते एकदा म्हणाले, 'एखाद्याचा खून करून रक्ताळ हातांनी तो खूनी माझ्याकडे आला व म्हणाला मी खून केला, तरी मी त्याला जवळ करीन. कारण तो सत्य सांगत आहे. परंतु असत्य मला क्षणभरही सहन होणार नाही.' ईश्वर म्हणजे सत्य अशी ते व्याख्या करीत. प्रसिद्ध युरोपियन तत्वज्ञानी स्पायनोझा म्हणे, 'जग सत्यावर चालले आहे. हा पुल पडत नाही. का? तेथे शास्त्रीय नियमानुसार तो उभा आहे म्हणून.' वेदामध्ये ऋत-सत्य हे शद्ब नेहमी येतात. 'ऋत' म्हणजे विश्वव्यापक सत्य, विश्वाचे नियमन करणारे, सुसंवाद निर्माण करणारे सत्य. सत्यातूनच अहिंसा येते. मला कोणाचा नाश करावयाचा काय अधिकार? मी माझ्या सत्याप्रमाणे जात जाईन. त्याच्यात सत्यता असेल तर ती जगाला खेचील. महात्माजींनी सत्य-अहिंसा साधने घेतली. त्यातूनच ब्रह्मचर्य, अपरिग्रह इत्यादी सारी व्रते निघाली. सारी शक्ती पुरूषार्थासाठी वापरली पाहिजे म्हणजेच ब्रह्मचर्य आले. ब्रह्मचर्य म्हणजे सर्वेद्रियांचा संयम. शारीरीक, बौद्धिक, मानसिक संयम. शक्तीचा संचय करून त्या शक्तीने स्वतःचे जीवन व सभोवतालचे जीवन प्रकाशमय करीत जावयाचे जनतेचा सुखाचा संसार करायचा तर शासनसंस्थाही जनतानुकूल हवी. जनतेच्या जीवाचा कोंडमारा होत असेल तर कोठून प्रगती? शासनसंस्थाचनसावी. सारा मानवसमाज सहकारी तत्वावर चालावा असे त्यांना वाटे. परंतु ते अराजक सहकारी युग केव्हा येईल ते येवो, तोवर लोकशाही सत्ता तरी हवी. हुकुमशाही, साम्राज्यशाही नको. म्हणून महात्माजी राजकारणी झाले; परंतु तेथेही निर्मळ साधने घेऊन ते उभे राहिले. सर्वांना निर्भय केले. असत्याशी, अन्यायाशी असहकार करा म्हणून म्हणाले. त्यांनी निशस्त्र जनतेला निर्भयतेचे व्यावाहारिक शस्त्र दिले. जगातील निशस्त्र जनता मार्ग शोधीत होती. तिला गांधीजींनी कायदेभंग, करबंदी, राष्ट्रव्यापक संप, अशा अविष्कारात सत्याग्रह दिला. ते प्रयोग त्यांनी जन्मभर केले. जगाच्या इतिहासात एक नवीन दालन

उघडले. दहा हजार वर्षानंतर एक नवीन प्रयोग त्यांनी सुरू केला. हा त्यांचा सर्वात महत्वाचा अवतार.

आज मानवसमाज जवळ आला आहे. राष्ट्रे जवळ आली आहेत. क्षणात जगातली वार्ता कळते. अशावेळेस सर्वांविषयी प्रेम हवे, बंधुता हवी. अनेक धर्म, संस्कृती मानवणारे मानववंश एकत्र येणार. भारताचे तर हे वैशिष्ठ्यच आहे. श्री रामकृष्ण परमहंसांनी हिंदुधर्माचे युगधर्मरूप दाखवले. विवेकानंदांनी शिकागोला 'युनिव्हर्सल रिलीजन' विश्वधर्म हिंदुधर्मच होऊ शकेल असे सिद्ध केले. याचा अर्थ इतर धर्मीयांना हिंदु करणे नव्हे, तर इतर धर्मांनीही उदार होणे. सर्व धर्म मुळात बंधुता, विश्वकुटुंबता शिकवतात. महंमद म्हणाले, 'अरबांनो, मी तुम्हाला धर्म देत आहे. इतरांना इतरांच्या द्वारा प्रभूने धर्म दिला असेल. सर्व धर्मांना मान द्या.' ही गोष्ट शिकायची आहे. सर्वधर्म समभाव म्हणजे सर्वधर्म ममभाव. म्हणून श्री रामकृष्ण परमहंस चर्च, मशीद सर्वत्र जाऊन साक्षात्कार घेते झाले. तीच परंपरा महात्माजींनी पुढे नेली. ते सर्व धर्मांच्या प्रार्थना म्हणत. दिल्लीला कुराणातील प्रार्थना म्हणायला काही श्रोते विरोध करीत. गांधीजी त्यांना समजावून सांगत. खांडव्याच्या एका मंदिरात विनोबांच्या हस्ते सर्व धर्मांचे ग्रंथ ठेवण्यात आले. विनोबाजी कुराण शिकले. महात्माजींनी दिलेली ही थोर शिकवण आहे.

यातून हिंदु-मुस्लिम ऐक्य ते करत राहिले. हिंदुस्थानात कोट्यावधी मुसलमान. पाकिस्तान झाले तरीही हिंदी संघराज्यात मुसलमान आहेतच. म्हणून आपण एकत्र राहाण्याचा प्रयोग करीत राहिले पाहिजे. तो न करता आला तर जीवनाला अर्थ तरी काय? सर्वांना एकत्र नांदवण्याचाच प्रयोग भारत करीत आला. महात्माजींनी तोच प्रयोग पुढे चालवला. यासाठी त्यांनी एकवीस दिवसांचा उपवास केला. यासाठीच पुन्हा जीवनाच्या अखेरीस त्यांचे दोन उपवास. याचसाठी त्यांचे महान बलिदान! महात्माजींचा हा दुसरा अवतार.

सर्व-धर्म-समन्वय ते करीत होते; परंतु हिंदुधर्मातच आधी किती छकले. अस्पृश्यतेचा केवढा कलंक! कोट्यावधी लोक माणुसकीला दुरावलेले. महात्माजींनी आश्रमात हरिजन कुटुंब घेतले. परंतु १९३२ मध्ये हे कोट्यावधी हिंदु समाजापासुन दुरावत होते. तेव्हा येरवड्यास उपवास सुरू केला आणि मग २१ दिवसांचा

उपवास पुन्हा केला. देशभर दौरा काढला. हृदयेमंदिरे मोकळी केली. अस्पृश्य हा शद्बही त्यांना सहन होईना. हरिजन हा सुंदर शद्ब रूढ केला. ही देवाची माणसे. हजारो वर्षे सेवा करत आलेली. किती त्यांच्यात साधुसंत झाले. अरे, त्यांना जवळ घेऊन स्वतः पवित्र व्हा. मानवता शिका. असे जणू त्यांनी सुचवले. हिंदुस्थानभर या प्रश्नाला चालना दिली. पाकिस्तान आपल्या अस्पृश्यतेसारख्या पापातूनच जन्मले. ज्यांना ज्यांना दुर लोटले ते परधर्मात गेले. हे पाप कोठवर करणार? हिंदु धर्म म्हणजे का शिवाशिवी? कोठे ते अद्वैत? सर्वांच्या ठिकाणी प्रभूला पाहायची थोरशिकवण? महात्माजींनी हिंदु धर्माला उजाळा दिला. त्यांचा हा तिसरा अवतार.

मानवाला मानव म्हणून जगता आले पाहिजे. त्याच्या सर्व शक्तीचा विकास व्हावा. अस्पृश्यांना दडपून ठेवले. स्त्रियांनाही. त्यांना आम्ही अबला म्हणत आलो. गांधीजींनी स्त्रीशक्ती जागी केली. त्यांनी स्वातंत्र्यासाठी मार्गच असा शोधून काढला, जेथे सर्वांना येता येईल. संसारात अपार कष्ट सहन करणाऱ्या स्त्रिया, सासू-सासरे, नणंद, पति यांच्याकडून होणारी मारहाण, मानहानी सहन करणाऱ्या स्त्रिया ब्रिटिशांच्या दंडूक्यासमोरही उभ्या राहिल्या. त्या दारूच्या दुकांनावर, परदेशी मालांवर निरोधने करू लागल्या. बेकायदा मीठ तयार करू लागल्या. शेतकऱ्यांच्या मायबहिणींपासून तो पांढरपेशा स्त्रियांपर्यत साऱ्या तुरूंगात जाऊ लागल्या. नवीन तेज स्त्रियांत संचरले. काँग्रेसचे काम करायचे असेल तर घर सोडून जा, असे पतिने बजावताच ज्या निघून गेल्या, अशा भगिनींची नांवे मला माहीत आहेत. भारतीय युद्धात स्त्रियांची थोर कामगिरी! महर्षि अण्णासाहब कर्वे पोलिसांच्या समोरून निर्भयपणे स्त्रिया जात आहेत असे पाहून म्हणाले, 'माझ्या डोळ्यांचे पारणे फिटले!' कारण 'सा विद्या या विमुक्तये' ज्ञान मुक्त करणारे हवे. स्त्रियांच्या आत्म्याचे ग्रहण सुटावे म्हणून अण्णासाहेब कर्वे स्त्री-शिक्षणास वाहून घेते झाले. महात्माजींनी स्त्रियांच्या आत्म्याला हाक मारली आणि ब्रिटिशांच्या गुलामगिरीविरूद्ध लढणाऱ्या स्त्रिया घरातही मुक्त होऊ लागल्या. विजयालक्ष्मी अमेरिकेत म्हणाल्या, 'महात्माजींनी आमचा आत्मा मुक्त केला. स्त्रियांवर त्यांचे थोर उपकार!' महात्माजींचे हे चौथे अवतारकार्य!

राष्ट्र, समाज यांना नवीन वळण देणे म्हणजे नवीन शिक्षणच हवे.

महात्माजींनी राष्ट्राचा अन्तर्बाह्य कायापालट होईल अशी मूलोद्योग शिक्षणपद्धती भारताला, जगाला दिली. तोपर्यंतचे शैक्षणिक प्रयोग लक्षात घेऊन ही तयार करण्यात आली आहे. मानसशास्त्र व सामाजिक गरजा यांचा येथे समन्वय आहे. मुलांमध्ये अपार शक्ती असते. ती शाळांतून मारली जाते किंवा घोकंपट्टीच्या कामी येते. मुलांचे हात, डोळे, बुद्धी सर्व काहीतरी धडपड करायला, निर्मायाला उत्सुक असतात. त्यांना काम द्या, काम करता करता गाणे शिकवा, गोष्ट सांगा. त्या कामासंबंधीचे गाणे, तत्संबंधीची गोष्ट. अशारीतीने उद्योगाशी ज्ञानाचा, माहितीचा मेळ घाला. त्या उद्योगातूनच ज्ञान घ्या. श्रमाची महतीही मुलांना कळेल. ती पोषाखी होणार नाहीत. त्यांच्या बुद्धीला चालना मिळेल. निर्माणशक्तीस वाव मिळाल्यामुळे ती संशोधक होतील, कल्पक होतील आणि या गरीब राष्ट्रात सक्तीचे शिक्षण करायचे असेल, तर शिक्षणच अर्थोत्पादक व्हायला हवे. मुले अनेक उपयुक्त व सुंदर वस्तू निर्माण करीत आहेत, त्यातून शाळेलाही आर्थिक मदत मिळत आहे, मुलांनाही थोडी मजूरी मिळत आहे. गरीब शेतकऱ्यांची मुले शाळेत आली, तर घरी कोण मदत करणार? मुले शाळेत उद्योग शिकून, साक्षर होऊन घरी मदतही आणतात, असे आई-बाप पाहतील, तर आनंदाने मुलांना शाळेत पाठवतील, नाहीतर सक्ती मानगुटीस बसेल. महात्माजींच्या या शिक्षणपद्धतीत अपार सामर्थ्य आहे. हा प्रयोग पुढे नेऊन जगाच्या शिक्षणशास्त्रात भर घालूया. महात्माजींचा हा पाचवा अवतार.

हिंदुस्थानात लाखो खेडी आहेत. त्यांची का हजार-पाचशे शहरे बनवायची?

महात्माजी म्हणतात-

(१) संपत्ती एका हाती नको.

(२) सत्ता एक हाती नको.

(३) लोकही एखाद्या शहरात कोंबू नका.

संपत्तीचे, सत्तेचे व प्रजेचे विकेन्द्रीकरण. हिंदुस्थानात जनतेचे आधीच विकेन्द्रीकरण आहे. लाखो खेड्यातून जनता आहे, ती तेथे राहो. तेथेच त्यांचे उद्योगधंदे उर्जितावस्थेत आणू. त्यात शोधबोध करू. स्वस्त वीज पुरवू. सुधारलेला

चरखा, सुधारलेली तेलघाणी, सारे सुधारू. हे धंदे गावोगाव राहिले तरच संपत्तीचे विकेन्द्रीकरण आपोआपच होईल. काही मोठे कारखाने लागतील. आगगाडी, विमान, विजेची यंत्रे ही कारखान्यांतूनच होणार. हे कारखाने राष्ट्राचे करावे. अशा रितीने यंत्रे व ग्रामोद्योग यांचा अविरोधी समन्वय करावा असे महात्माजी सुचवतात. तदर्थ त्यांनी अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ काढला. त्यांना शोध हवे होते. ते शास्त्राचे उपासक होते. सुधारलेल्या चरख्याला त्यांनी बक्षीस ठेवले होते. महात्माजींचा हा सातवा अवतार.

गाय म्हणजे करूणेचे काव्य असे महात्माजी म्हणाले. कृषिप्रधान राष्ट्राला गायीची जरूरी. गोपालकृष्णाने गायीचा महिमा वाढवला. परंतु आपण म्हशीचे उपासक बनलो. गायीचे दुध औषधालाही मिळत नाही. नुसते पांजरपोळ काय कामाचे? खाटीकखान्यात गायी जातात. का? त्या परवडत नाहीत. गायी दुध देणाऱ्या. सकस दुध देणाऱ्या व्हायला हव्यात. गायीच्या दुधाने उंची वाढते, आरोग्य सुधारते बुद्धी सतेज राहते. युरोप-अमेरिकेत सर्वत्र गायीचे लोणी. आपल्याकडे फक्त शद्बच उरले ! महात्माजी म्हणाले, 'गाय आर्थिक दृष्टीने परवडेल तेव्हाच ती खाटकाकडे जाणे बंद होईल.' यासाठी गायीची अवलाद सुधारली पाहिजे. शास्त्रीय गोरक्षण सुरू व्हायला हवे. गायीचेच दुध पिईन अशी प्रतिज्ञा करणारी माणसे हवीत. स्वर्गीय जमनालालजींना हे काम अपार आवडले. वर्ध्याजवळ त्यांनी गोपुरी वसवली. महात्माजींनी सर्वत्र ध्येयवाद कृतीत आणायला शिकविले. गायीच्या शेपटीला हात लावून गायीचा महिमा वाढणार नाही. शास्त्राची उपासना तर वाढेल. महात्माजींचे गोरक्षणाचे कार्य हे सातवे अवतार कार्य.

त्यांनी आहारचिकित्सा केली. मिरच्या मसाले यांची जरूरी नाही. बायकांचा कितीतरी वेळ या भाकड गोष्टीत जातो. कच्चा आहारही चांगला. त्यांनी उतारवयात तेही प्रयोग केले. आधी अनुभवायचे मग सांगायचे. त्यांना प्रयोग झेपले नाहीत. भाज्या नुसत्या उकडाव्या नि खाव्या, तळणे तर विषमय. तांदूळ न सडलेले, ते सत्वयुक्त असतात. आधी आंधळे-पांढरे फटफटीत तांदूळ खावून मढी बनलो. परंतु अजून पांढरे करूनच आणीत आहोत. कणकेतील कोंडाही असावा. परंतु बायका चाळून फेकून देतात. सारा मुर्खपणा ! खेड्यापाड्यात जनतेला तेथेच जीवनसत्वयुक्त

आहार कसा मिळेल, म्हणून या महापुरूषाला विवंचना. चिंच, निंबाचा पाला, घोळीची भाजी, इत्यादी वस्तू ते 'केमिकल ॲनलायझरकडे' रासायनिक पृथक्करण करणाऱ्या खात्याकडे पाठवीत. लिंबू नसेल रोज मिळत, तर चिंचेचे सार करा. ते चिंचेला 'गरीबांचे लिंबू' म्हणत. आहारात साधेपणा, शास्त्रीय दृष्टी त्यांनी आणली. काय खावे काय प्यावे, येथपासुन राष्ट्राला हा राष्ट्रपिता शिकवीत होता. हे आठवे अवतारकार्य.

आहार तरी कशासाठी? आरोग्यासाठी. डॉक्टरचे मुख्य काम रोग होणारच नाहीत हे असावें. महात्माजी निसर्गोपचाराचे उपासक. पंचभौतिक देहाला पंचभौतिक उपायच बरे. पृथ्वी, आप, वायू, तेज, आकाश या पंच साधनांनी रोग बरे करावेत. काही रोग मातीने हटतील. काही रोग पाण्याचे प्रयोग करून. काही प्रकाशकिरणांनी, काही हवेमुळे आणि काही आकाशाप्रमाणे मन अलिप्त नि शांत ठेवून. महात्माजींनी अनेकांवर हे प्रयोग केले. स्वतःवर केले, कुटुंबियांवर केले. मुलाचे प्राण धोक्यात असतानाही प्रयोग सोडला नाहीत कारण प्रयोगाची सिद्धी त्यावर अवलंबून. झोप न येणाऱ्यांना काळी माती ओली करून फडक्यात ठेवून झोप लागते असे सिद्ध झाले आहे. ओटीपोटावरही काळ्यामातीचा थर ठेवून काही रोग बरे होतात. शेवटी शेवटी तर महात्माजी मानसोपचारी झाल्यासारखे दिसतात. एक रामनाम पुरे ते म्हणत. त्याने मन शांत राहिले तर शरीरही शांत, रोगरहित, आधीव्याधीरहित होईल असे ते म्हणत. परंतु तितकी श्रद्धा नि विश्वास यांची आवश्यकता असते. आजकाल जरा काही होताच आपण बाटली घेऊन जातो. केवळ पंगू नि दुबळे होऊन गेलो आहोत. पोषाखी बनत आहोत. शरीराला हवा, प्रकाश लागूच देत नाही. महात्माजी फार कपडे वापरीत नसत. देवाची हवा, प्रकाश अंगावर खेळवत. ते नियमितपणे फिरण्याचा व्यायम घेत. अशाप्रकारे स्वतःचे आरोग्य त्यांनी सुंदर ठेवले. ते मालिशही नियमित करून घेत. त्यामुळे रक्ताभिसरण व्हायला मदत होते. महात्माजींनी निसर्गोपचाराची दिलेली ही थोर देणगी आहे. हे त्यांचे नववे अवतारकार्य.

आणि एक दहावे सांगतो. राष्ट्राचे हृदय एक व्हायला हवे असेल तर तशी एक भाषाही हवी. आपल्या प्रांतीय भाषा असल्या तरी त्या ठेवून सर्वव्यापक

अशी हिंदी भाषाही घ्या असे ते म्हणाले. त्यांनीच दक्षिणेकडे आधी हिंदी प्रचार सुरू केला. ते एकच कार्य किती महान आहे! ते अशी हिंदी बोला सांगत होते की जी सर्वांना समजेल. ती नको केवळ संस्कृतनिष्ठ, नको केवळ फारशी. ता जनतेची करा. परंतु आमच्या अहंकारी लोकांचा येथेही विरोध! गांधीजी उर्दू लिपीही शिका सांगत. तीन-चार कोटी मुसलमानांची लिपी शिकणे कर्तव्यच आहे. परंतु एवढेच नाही. आपल्या पश्चिमेकडे सारी मुस्लिम राष्ट्रे आहेत एक तुर्कस्तान वगळले तर सर्वांची एकच लिपी. तुम्हाला अभ्यासावीच लागेल. त्या राष्ट्रांचे राजकारण, इतिहास, सारी चळवळ कशी कळणार? इंग्रजी वृत्तपत्रे नि मासिके यांजवरून? ती ती राष्ट्रे आपल्या दृष्टीकोनातून लिहिणार. तुम्हाला आशियातील राष्ट्रांचा संघ उद्या करावयाचा असेल तर उर्दू शिकण्यावाचून गत्यंतर राहणार नाही. महात्माजींची दूरदृष्टी संकुचित दृष्टी घेणाऱ्या आमच्या पुढाऱ्यांनाही कळत नाही, मग इतरांची कथा काय?

महात्माजी नौखालीत गेले तर हातात बंगाली क्रमिक पुस्तके असत. तामिळ त्यांना थोडे येई. मराठी येरवड्यास मनाच्या श्लोकांवरून शिकले. ते मूर्तिमंत भारत होते. भारतातील कोट्यावधी बंधूंच्या जीवनाशी एकरूप व्हायचा अनुभव घेऊ पाहणारे, घेणारे होते. भारताचे दोन तुकडे झाले तरी या दोन्ही देहांत मला प्रेमस्नेहाचे एक मन निर्माण करू दे, म्हणून अखेर अखेर तडफडत होते. इकडे शांत राहा मी पाकिस्तानात जातो असे सारखे म्हणत ! केवढा महापुरूष, राष्ट्राचा तात ! देवाची देणगी आपल्याला मिळाली होती. देवाने नेली. परंतु त्यांची शिकवण आहे. अनेकांगी व्यापक शिकवण. सारे जीवन अन्तर्बाहय करणारी शिकवण. रामदास मरताना म्हणाले, 'मी दासबोधात आहे. दुःख करू नका!' महात्माजी १९३१ मध्ये कराचीस म्हणाले होते, 'माझी मुठभर हाडे तुम्ही तेव्हाच चिरडू शकाल. परंतु ज्या तत्वासाठी माझी जीवन आहे, ती अमर आहेत.' महात्माजींची शिकवण अमर आहे, म्हणून तेही अमर आहेत. प्रणाम राष्ट्राच्या पित्याला, थोर बापुंना. त्यांच्या शिकवणीप्रमाणे आमची धडपड चालो.

[library stamp]

७. कुमारांकडून अपेक्षा

मित्रांनो,

कुमार-साहित्य-संमेलनाच्या ह्या चौथ्या अधिवेशनाला अध्यक्ष, म्हणून तुम्ही मला बोलावलेत ह्याबद्दल मी तुमचा आभारी आहे. खरोखरच मला जागेचा भार वाटतो आहे. जवळ जवळ एक वर्षापासून या चळवळीचे संचालक श्री. वीरेन्द्र अढिया यांनी मला तगादा लावला होता. मी नेहमी नाही म्हणत असे आणि ते, त्या नकारात होकार समजत. त्यांच्या श्रद्धेचा शेवटी विजय झाला आहे. मी सर्व ठिकाणी गेली दोन वर्षे नकार देत आलो आहे. बनावच असा रचला गेला की, मी त्यात अडकलो. एक हजार रूपयांच्या रूपेरी पाशाने नव्हे, त्यात मी कधी पकडला जात नसतो. दुसऱ्याच गोष्टीमुळे. नागपूरला जायचे वावडे होते आणि येथे यायची आवड होती असे नाही. मी सर्वांनाच प्रांजलपणाने सांगे की, तुम्हाला देण्यासारखे माझ्याजवळ काही आहे असे वाटत नाही. ज्या ज्या ठिकाणी मी नकार दिला त्यांनी रागावू नये.

मराठी भाषेवर माझे अपार प्रेम आहे. बाळपणापासून मी तिचा भक्त आहे. मराठी वाङ्मयावर मी पोसलेला आहे. मराठीवर प्रेम करण्यात मी कोणाला हार जाणार नाही. येथे अध्यक्ष व्हायला दुसरी कोणतीच माझी पात्रता नाही. प्रेमाच्या बळावर मी येथे बसलो आहे. ज्याप्रमाणे मराठी भाषेवर माझे अपार प्रेम आहे, त्याचप्रमाणे मुलांवर, तरूणांवर, विद्यार्थ्यांवर माझा जीव आहे. मी त्यांना काही

विशेष दिले आहे असे नाही. परंतु त्यांच्यात राहावे, मिसळावे असे मला वाटत असे. त्यांच्यात राहून मीच नेहमी नवतरूण राहात असतो.

मराठीवरील प्रेमामुळे आणि तुमच्यावरील लोभामुळे तुमच्यासमोर मी उभा आहे. दुसरे भांडवल माझ्याजवळ नाही. मित्रांनो, आतापर्यंत तुमची तीन अधिवेशने झाली. अधिकारी व्यक्तींनी तुम्हाला मार्गदर्शन केले. आनंद मासिकाचे नवीन दृष्टीचे नि सहृदय राष्ट्रीय वृत्तीचे संपादक श्री. गोपीनाथ तळवळकर हे तर तुमचे अखंड वाटाड्ये. प्रथितयश टीकाकार प्राध्यापक क्षीरसागर यांचेही मार्गदर्शन तुम्हाला होत असते. नुकतेच लोकमान्याचे प्रख्यात संपादक आणि वादविवेचनमालेचे प्राण श्री. पां. वा. गाडगीळ - जे नवविचारांचा पावा नेहमी वाजवतात- त्यांनी नागपूरहून तुम्हा सर्वांना मार्गदर्शन केले आहे. इतरही लेखकांचे, विचारवंतांचे, थोरामोठ्यांचे तुम्हाला सहाय्य होत असेल, झाले असेल आणि तुम्हीही हस्तलिखिते, अभ्यासमंडळे चाल्वून बळ वाढवीत आहात. परंतु आज मी तुम्हाला काय देऊ, काय सांगू? कोणता संदेश, कोणता उपदेश? कोणता सल्ला, कोणता मार्ग? कोणता अनुभव, कोणते विवेचन?

मी गोंधळून गेलो आहे. मीं थोडेफार लिहिले असले तरी मी हाडाचा साहित्यिक नाही. साहित्य कसे असावे याची फारशी चिकित्सा मी माझ्या मनात कधीही केली नाही. अमुक एकच लिहायचे असाही ठरविलेला बाणा नाही. साहित्य तंत्राचा मी कधीही अभ्यास केला नाही. मी तुमच्यासारखाच विद्यार्थी होतो, तेव्हा माझ्या मनात साहित्यसेवेचे अनेक विचार येत. परंतु मला पुष्कळसे तुरूंगातच लिहायला मिळाले. अनेक वर्षे मनात जमलेल्या भावना नि विचार यांच्या राशी येथे मी कागदावर ओतल्या. माझे हृदय रीते करीत असताना मला अपार आनंद होई. मी भावनांवर नाचत लिहिले. लिहिताना रडे, संतापे, रोमांचित होई. बंकिमचंद्राविषयी असे सांगतात की, ज्यादिवशी ते अत्यंत सुंदर लिहित, त्यादिवशी ते दुप्पट-तिप्पट मागून जेवत. बंकीम हे साहित्य सम्राट आहेत. मी सामान्य आहे. परंतु मलाही अनेकवेळा असा अनुभव आला आहे की, लिहून झाल्यावर गळून गेल्यासारखे होई. अपार भूक लागे. जणू मी माझ्या लिहिण्यात रक्त ओतीत होतो. सारे प्राण ओतीत होतो. मिल्टनने म्हटले आहे की, थोर वाड्मय रक्ताने लिहिलेले असते. माझे

वाङ्मय कसेही असो, त्यात मी रक्त ओतले आहे. ते रद्दड असले तरी त्यात प्राण आहे, तेथे रक्त आहे, अश्रू आहेत. माझ्या वाङ्मयाला हात लावाल, तर माझ्या हृदयाला हात लावाल. माझे वाङ्मय माझी वाङ्मयीन मूर्ती आहे.

हे सारे मी का सांगत आहे? एक गोष्ट आरंभीच मला सांगायची आहे म्हणून. तुम्ही साहित्याची उपासना करू इच्छिणारे. ती उपासना उत्कटपणे करा. एकही ओळ अशी लिहू नका की जी केवळ औपचारिक आहे. जे लिहावे त्यात प्राण ओता. गटे म्हणाला होता, 'अनुभवाशिवाय मी एकही ओळ लिहिली नाही.' मित्रांनो, जीवन असो की कला असो, सत्याच्या अधिष्ठानानेच त्याला मोल चढत असते. तुम्ही स्वतःशी सत्यरूप राहा. लिहिण्यासाठी म्हणून लिहू नका. तुम्हाला आत भूक असेल, वेदना असेल, तरच लेखणी हाती घ्या. हृदय भरलेले असेल, डोके भरलेले असेल तर लिहायला घ्या. रिकाम्या आडातून काय मिळणार? दांभिक पसाऱ्याचा काय उपयोग? मनुष्याचे भाग्य आहे की हातांनी तो जे करतो ते आधी त्याच्या हृदयात असते. भारतीय जीवनाच्या सर्वच क्षेत्रात आज सत्याची, उत्कटतेची नि प्रामाणिकपणाची नितांत आवश्यकता आहे. अतःपर कसातरी संसार आपणास करायचा नाही. तेजस्वी संसार चालवायचा आहे. खरे तेज सत्यातूनच प्रकट होत असते.

देशबंधू दासांनी सागर-संगीत नावाचे काव्य लिहिले. त्यांची आई आजारी होती. देशबंधू घरी नव्हते. ती माता म्हणाली, 'त्याचे सागर-संगीत आणून द्या. ते मी जवळ घेईन. त्यात माझा चित्तरंजनच आहे.' तुम्ही जेव्हा साहित्य निर्मू लागाल, तेव्हा तुमच्या पुस्तकाविषयी असे म्हणता येऊ दे. ज्यांना असे म्हणता येईल की, माझ्या पुस्तकात मी आहे, ते साहित्यिक धन्य होत. त्यांना माझा प्रणाम !

मराठी सारस्वत थोर आहे. त्याचा पायाच मुळी एका ज्ञानवैराग्यसंपन्न कुमाराने घातला. ज्ञानेश्वरांनी भावार्थदीपिका लिहिली. एकदा पूज्य विनोबाजी भावे म्हणाले, 'ज्या भाषेत ज्ञानेश्वरी आहे, ती माझी मातृभाषा आहे हे माझे परमभाग्य होय.' विनोबाजींनी सर्व भारतीय भाषा अभ्यासल्या आहेत. अरबी, इंग्रजी, फ्रेंच याही त्यांना येतात. परंतु ज्ञानेश्वरीतील अमृतासमान ओव्या आणि

तुकोबांचे प्राणमय अभंग यांनी त्यांना जणू भरते येते. अशा ज्ञानेश्वरीच्या पायावर मराठी सारस्वताचे मंदीर उभारलेले आहे.

आणि त्या कुमाराची कोणती प्रतिज्ञा होती? मराठीच्या प्रांतात ब्रह्मविद्येचा सुकाळ करण्याची त्यांची प्रतिज्ञा होती आणि या प्रतिज्ञेचा हेतू काय होता?

जे खळाची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो
भूतां परस्परे पंडो । मैत्र जीवांचे
दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सुर्ये पाहो
जो जे वांछील तो ते लाहो । प्राणिजात

या ध्येयासाठी त्यांना ब्रह्मविद्येचा सुकाळ करावयाचा होता. ब्रह्मविद्येचा 'थोर विचार' असा मी अर्थ करतो. ब्रह्म म्हणजे मोठी वस्तू. क्षुद्रवस्तूंचे विचार त्यांना नको होते. मोठे विचार मांडून समाजातील विषमता, अन्याय, पाप यांचा अंधार त्यांना दूर करावयाचा होता. प्रत्येकाला कर्तव्याचा पंथ दिसावा म्हणून त्यांची खटपट होती. स्वधर्माप्रमाणे वागणे म्हणजे स्वतःतील गुणधर्माचा विकास करून तद्द्वारा समाजाची सेवा करणे. परंतु विकास होण्यासाठी समाजात वाव हवा. तेथे समता हवी, स्वातंत्र्य हवे. तेथे मोठे विचार हवेत. बंधूभाव हवा आणि असे होईल तरच सर्वांना आवश्यक ते सारे मिळेल. ददात राहणार नाही. समाजातील जीवनात ब्रह्मविद्या असेल तर कोणी दरिद्री, दुःखी, शोषित राहणार नाही.

मित्रांनो, ज्ञानदेवांनीच तुम्हाला दिव्य मार्गदर्शन केले आहे. समाजात ब्रह्मविद्येचा सुकाळ करून दुःखदैन्य दूर करा आणि सर्वांचे संसार सुखी होतील असे करा. तर मग तुम्ही या ध्येयाहून कमी प्रतीचे ध्येय डोळ्यासमोर ठेवणार का? उपनिषदात म्हटले आहे,

भूमा एव सुखं न अल्पे सुखमस्ति

मोठ्या वस्तूंत सुखं आहे. क्षुद्र वस्तूंत सुख नाही.

आज उपासना करून, अभ्यास करून, तपश्चर्या करून जे साहित्य उद्या तुम्ही निर्माल, ते मोठ्या गोष्टींना प्रकट करू दे. आजही ब्रह्मविद्येचा सुकाळ हवा आहे. मराठी वाङ्मयात उदात्त विचारांचा, उदार भावनांचा भरपूर पाऊस पडायला

हवा आहे. त्यात शास्त्रीय दृष्टीचा रंगही मिसळा. तुम्ही तुमच्यासमोर हे असे मोठे ध्येय ठेवा.

समाजाला सुखी करायचे आहे ना? तुमची कला आनंदासाठी आहे ना? तर मग माझे सांगणे असे की, त्याच्या जीवनात आनंद राहावा म्हणून तुम्ही मुळाशी हात घाला. उपाशी माणसाला दोन बिस्किटांनी समाधान होणार नाही. त्याला नेहमी भरपूर भाकर मिळायला हवी. शेतात भरपूर पिकायला हवे असेल, तर शेत नीट नांगरावे लागते. नुसती मेथी पेरायची असेल तर फार खटाटोप नको. परंतु नुसत्या मेथीच्या भाजीने पोट भरत नसते. मेथी-कोथिंबीर हवी; परंतु तांदूळ, गहू, ज्वारी यांनी पुष्टी मिळते. ही धान्य हवी असतील तर खोल नांगरणी हवी. गहू हवे असतील तर ज्याप्रमाणे नांगर खोल दवडावा लागतो, त्याप्रमाणे समाजाला सुखी करायचे असेल तर खोल लेखणी दवडा. पीक नीट यावे म्हणून कुंदा, हरळी नांगरून काढावी लागते. त्याप्रमाणे समाजाच्या सुखाच्या आड येणाऱ्या सर्व गोष्टींचे उच्चाटन करण्यासाठी लेखणी उचलू, अशी प्रतिज्ञा करा.

समाजातील मुठभर लोकांचे अलसलुलित संसार रंगवून लेखणीचे ललित कृतार्थ मानू नका. तुमची लेखणी तमाम जनतेची प्रतिनिधी होऊ दे. जनतेची बाजू घूऊन उठू दे. तुमच्या लेखणीच्या कतृत्वाला आज वाव आहे. मोठमोठे विचार सभोवती घोंघावत आहेत आणि समोर दु:खी, कष्टी अपार जनता आहे. भग्न असा विराट संसार आहे. तुमच्या मनोबुद्धी सानुकंप असतील, संवेदनाक्षम, संस्कारक्षम असतील, तर वातावरणातील हे अदृश्य वारे तुम्हाला कळतील. तुम्ही का केवळ दृष्याचे उपासक आहात? दृष्याभोवती विचारांच्या नि भावनांच्या लाटा उसळत असतात. प्रत्येक वस्तूभोवती विचारांचे, भावनांचे वलय असते. ज्याप्रमाणे अणू विभांडून त्यातील अनंत शक्ती शास्त्रज्ञ मुक्त करतात, त्याप्रमाणे या संसाराभोवती जी विचारवादळे घोंघावत असतात, त्यांची शक्ती पकडून ती घरोघर नेऊन पोहोचविणे आणि तिच्या जोरावर क्रांती घडवून आणणे हे कार्य साहित्यिकांचे आहे. लोकांची मनोरचना बदलणे हे थोर कार्य आहे. खरी खूरी सुधारणा व्हायला हवी असेल ,तर क्रांती हवी असते. आंतर्बाह्य क्रांती. मानसिक

आणि सामाजिक. ती क्रांती घडवून आणून कायमच्या सुखाकडे मानव नेणे हा तुमचा थोर वारसा आहे.

नवसमाज निर्मिती करायचा आहे, दलदली हटवायच्या आहेत, विषारी तण जाळायचे आहे, अज्ञान दूर करायचे आहे, भ्रम हटवायचे आहे, दगड फोडायचे आहेत. तुम्ही या कामासाठी कंबरा बांधा. व्हॉल्टेअरने म्हटले आहे, 'रूढीविरूद्ध बंडाचे झेंडे हातात घेऊन जे जे उभे राहतील, ते ते सारे मानवजातीचे उपकारकर्ते होत.' म्हणून जनतेचे हृदय हलवून, तिच्या बुद्धीला धक्के देऊन क्रांती करायची आहे. महाराष्ट्रात साधूचरित नि बुद्धिप्रधान आगरकरांनी असा बुद्धिप्रधान झेंडा उभारला होता. परंतु अजूनही सर्व प्रकारची गुलामगिरी दूर करू पाहाणाऱ्या बंडखोरांची अत्यंत आवश्यकता आहे. आजही अजून सर्वत्र बुजबुजच आहे. अस्पृश्यांना अजूनही दूर ठेवीत आहोत. अजूनही कार्यक्रमावर जोर देण्याऐवजी जातिभेदावर जोर देत आहोत. हे भेदांचे भुंगे आजही समाजजीवन पोखरीत आहेत. आडनांवांच्या, जातींच्या नि धर्माच्या पलिकडे अजूनही आमची दृष्टी जात नाही आणि रूढी केवळ धार्मिकच असतात असे नाही. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, वाङ्मयीक सर्व प्रकारच्या रूढी असतात. या सर्व बूरसटलेल्या रूढींवर हल्ले चढवायला तुम्ही उभे राहा. सरंजामशाही नको, जमीनदारी नको, खोती नंको, खाजगी नफेबाज नको, पिळवणूक नको, कोणाची मिरासदारी नंको, यासाठी लेखणी हातात घेऊन उभे राहा. तुमचे पराक्रमी ललित येथे दाखवा. इतिहासात अनेक प्रवाह, अनेक चळवळी प्रथम अलग सुरू होतात. मग त्या एकात एक मिसळून एक महान प्रवाह होतो. कधी तो प्रवाह मग एखाद्या महान विभूतीत दिसू लागतो. अर्वाचीन भारतीय इतिहासात शिक्षणसुधारणा, स्त्रीसुधारणा, सामाजिक सुधारणा, धार्मिक सुधारणा, अस्पृश्योद्धार, हिंदू-मुस्लिम ऐक्य, आर्थिक सुधारणा, राजकीय सुधारणा, अशा अनेक चळवळींचे प्रवाह अलग अलग सुरू झाले. परंतु हे सारे, प्रवाह एकत्र होऊन राष्ट्रसभेचा महान प्रवाह निर्माण झाला आहे आणि हे सारे प्रवाह महात्माजींच्या महान व्यक्तिमत्वात आज एकत्र झालेले आपणास दिसतात. महात्माजी म्हणजे आजचे भारतीय युग आणि या युगात राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, सर्वच प्रवाह मिसळले आहेत. हे महायुग आहे.

एखादे युग धार्मिक असते, एखादे राजकीय, एखादे सांस्कृतिक; परंतु आजच्या भारतीय युगात ही सारी युगे एकदम जन्मली आहेत. एकात एक मिसळली आहेत.

अशा या युगाशी तुम्हाला एकरूप व्हायचे आहे. जीवनाची पूर्णता अनंतात आहे. तुम्ही एकटेच खोलीत बसून स्वतःच्या जीवनाचे धागेदोरे विणीत नका बसू. कृत्रिम, काल्पनिक जाळी नका विणू. तुमचा आत्मा सभोवतीच्या विराट जनतेच्या आत्म्याला भेटवा. विशाल सहानुभूतिशिवाय थोर सारस्वत संभवणार नाही. तुमची आजची स्फूर्तिसुद्धा सामुदायिक व्होवो. सर्वांची स्फूर्ती तुमच्याद्वारा प्रकट व्होवो. तुमचा उद्‌गार म्हणजे जनतेचा उद्‌गार, तुमचे गान म्हणजे ४० कोटींचे वृंदगान!

कोणतीही कला सोपी नाही. तेथे साधना लागते. तपेच्या तपे द्यावी लागतात. कला म्हणजे पूर्णता. कला परिपूर्णतेची अपेक्षा करते. खूप वाचा, उत्तमोत्तम नमुने वाचा. प्राचीन वागीश्वर वाचा, अर्वाचीन वाग्भट अभ्यासा. प्रतिभावान नाटककार आणि थोर कवि गोविंदाग्रज यांना मोरोपंतांच्या पाच हजार ओव्या पाठ येत होत्या. मुक्तेश्वर म्हणतो, 'एकेक अक्षराची भीक' मागून मी हे लिहित आहे. स्वभाषेतीलच नव्हे, तर परभाषेतीलही वाङ्मय अभ्यासा. ज्ञानाच्या क्षेत्रात सीमा, सरहद्द नाहीत. सारे जागतिक वाङ्मय तुमच्यासमोर आहे. महान साहित्यिक हा मोठा वोर असतो. वडाचे झाड दूरवर पाळेमुळे पसरून ओलावा घेते. महान साहित्यिक सारे काही घेऊन स्वतःच्या भावनांच्या मुशीत घालून आपल्या वैशिष्ट्यांचा नि व्यक्तिमत्वाचा ठसा-जिवंत ठसा त्यावर मारीत असतो. केवळ स्वयंभू असे जगात काही एक नाही. शेक्सपिअरने अनेक जुनी कथानके घेतली; परंतु त्याने कोळसे घेऊन त्याचे हिरे केले. कालिदासाने महाभारतातून शाकुंतल घेतले. परंतु नवीनच अभिनव वाग्विलास त्याने करून दाखविला. रवींद्रनाथांवर उपनिषदे, कबीर यांचा अपार परिणाम झालेला आहे.

थोर ग्रंथांचे अध्ययन करा. परंतु तेवढ्याने भागणार नाही. जीवनग्रंथांचा खोल अभ्यास करा. प्रत्येक प्राणी म्हणजे विश्वग्रंथांचे पान आहे. प्रत्येक जीवन म्हणजे महाकाव्य आहे. ही जीवने तपासा. मुंबईच्या चाळीतून जा. दहा हात लांबी-रूंदीच्या खोलीत सहा सहा कुटुंबे कशी राहतात ते पाहा आणि साहित्यिक असाल, तर असा आगीचा डोंब पेटवा की ज्या समाजरचनेत हे शक्य होते, ती

भस्म होईल. जा, शेतकऱ्यांची जीवने तपासा. खंडोगणती धान्य पिकवणारे दैवाचे शेतकरी दुर्दैवी का? ही धरित्रीची लेकरे उपाशी का? त्यांच्या मुलांना दोन दोन दिवस काकडीवर, आठ आठ दिवस आंब्याच्या कोयांवर, काही दिवस चिंचोक्यावर राहायची पाळी का? साहित्यिक म्हणजे सहानुभूतीचा सागर. ज्या मानाने तुमची सहानुभूती मोठी, त्या मानाने तुम्ही मोठे साहित्यिक. तुमच्या सहानुभूतीची लांबी-रूंदी कोठवर पोहोचते ते पाहा.

म्हणून माझ्या मित्रांनो, तुम्ही दरिद्रीनारायणात मिसळा. त्यांचे संसार पाहा. तेथील प्रश्न अभ्यासा, तेथील दृष्ये पाहा. अन्याय, जुलूम, व्यसने, उपासमार, अज्ञान- सारे पाहा आणि त्यांचे अमर ठसे उमटवून घेऊन त्यातून जिवंत साहित्य निर्माण करा. हे क्रांतीचे, प्रगतीचे युग आहे. व्यक्तिगत स्फूर्तीला सामुदायिक करून सर्वांच्या मनोबुद्धीभोवती असणारी बंधने तोडा. त्यांना ती दाखवा. तोडायला सांगा आणि स्वसामर्थ्याची जाणीव झालेले हे कोट्यावधी बंधू क्रांतीकडे, नवसमाजरचनेकडे ज्ञानविज्ञानाची तेजस्वी जाणीव घेऊन निघू देत. हा ज्ञा विज्ञानाचा संदेश भावनेच्या द्वारा तुम्ही पोहोचवा.

काय गाळावे नि काय ठेवावे हे कला जाणते. कलाबिला मला फारशी कळत नाही. परंतु या अर्थाचे एक वाक्य मी वाचले होते. कोणाचे चित्र रंगवा , कोणाचे रंगवू नये, हे कळले तरी पुरे. महत्वाचे असेल ते ठेवायला हवे. ज्याचे महत्व नाही त्याला दूर फेका. समाजात महत्वाचा वर्ग कोणता? कोणाला पुढे आणायचे? कोणाची प्रतिष्ठा वाढवायची? हे ज्याला समजले त्याला मी सामाजिक कलावान म्हणेन.

तुम्हाला आजचे जीवन तपासायला मी सांगत आहे. त्यातील साऱ्या दुष्ट, भ्रष्ट गोष्टींवर हल्ले चढवायला सांगत आहे. तुम्ही आजकालचे व्यापक जीवन खोल जाऊन अभ्यासाच. केवळ पुस्तकांतून नव्हे, तर प्रत्यक्ष हिंडून, फिरून, मिसळून. परंतु त्याच्या बरोबरच जुना इतिहासही वाचा. महाराष्ट्र, भारतवर्ष, यांचा इतिहास अभ्यासा. त्यातून तुम्हाला नवी दृष्टी मिळेल. भारताच्या दहा हजार वर्षाच्या इतिहासातील गतिनियम कळतील. तुमचा आत्मा आजच्या जीवनाशी मिसळाल, त्याचप्रमाणे हजारो वर्षे क्रान्त-उत्क्रान्त होत असलेल्या भारतीय आत्म्याचीही भेट

घ्या. पंडित जवाहरलालांनी 'भारताचा शोध' म्हणून महान ग्रंथ नगरच्या स्वातंत्र्यमंदिरात लिहिला. भारताच्या अखंड विकासमान आत्म्याची अनंत कालखंडातून हिंडून त्यांनी भेट घेतली. जुने इतिहास, परंपरा, दंतकथा, आख्यायिका या सर्वांचा अभ्यास हवा. खूप खाद्य मिळते. एखाद्या गोष्टीतून एकदम महान अर्थ सापडतो. परवा विनोबाजी म्हणाले, 'विराट पुरूषाला हजारो डोकी, हजारो हात असे वर्णन आहे. परंतू हजारो हृदये असे मात्र म्हटलेले नाही. हृदय एकच. तुम्ही कोट्यावधी भारतीय एका हृदयाचे व्हा.' केवढा थोर विचार या प्राचीन मंत्रातून त्यांना मिळाला. वेद, रामायण, महाभारत, उपनिषदे, शेकडो आख्यायिका, गोष्टी तुम्हास माहीत नसतात. असे नका करू. या सारस्वत सागरात मधून मधून बुड्या मारीत जा. कल्पनांचे तेथे अपार भांडार आहे.

हे सारे जुने काल्पनिक इतिहास, खोट्या दंतकथा कशाला? असे म्हणू नका. एका अर्थाने आपणही सारे काल्पनिकच आहोत. आपण म्हणजे क्षणभंगूर बुडबुडे, मृगजळे. आता आहोत. दुसऱ्या क्षणी नाही. परंतु क्षुद्र असूनही आपणास महत्व का? क्षणभंगूर असून आपण चिरंजीव आहोत. का? तर आपण लहानमोठे सारे कशाची तरी प्रतीके असतो. आपले जीवन म्हणजे काही विचार, काही ध्येये, यांची पुजा. आपल्या कृतीतून काहीतरी सत्य आपण प्रकटवीत असतो. त्या सत्याची, त्या दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या नि वाढत आलेल्या विचारांची, ध्येयाची आपण प्रतीके असतो आणि आख्यायिका, दंतकथा, परींच्या गोष्टी यांतील ती काल्पनिक पात्रे, पशुपक्षी, सारी सत्याची प्रतीके असल्यामुळे त्यांना तुच्छ नका मानू .

भारताच्या भव्य इतिहासाचा अभ्यस करा. त्यातून सामर्थ्य प्राप्त होईल आणि आजचा इतिहासही खोल दृष्टीने बघा. तिसरी गोष्ट म्हणजे निसर्गावर प्रेम करा. निसर्ग आपली माता आहे. शेक्सपिअर सृष्टीजवळ शिकला. माझ्या मनात कधी कधी विचार येतो की, जन्मणाऱ्या मुलांचे पोषण व्हावे म्हणून विश्वशक्तीने आईच्या स्तनात दुध निर्माण केले. परंतु मुलांच्या मनोबुद्धीचे पोषण व्हावे म्हणून कोणती योजना? शेवटी माझ्या ध्यानात आले की, 'समुद्रवसना नि पर्वतस्तनमंडला' ही सृष्टीमाता मनोबुद्धीचे पोषण करणारी. Books in brooks

sermons in stones. 'निर्झरात पुस्तके नि पाषाणात प्रवचने' असे शेक्सपिअरने म्हटले. तो महाकवि तिच्याजवळ शिकला. परंतु आपण या मातेची उपेक्षा करतो. निसर्गावर प्रेम केल्याशिवाय तुमच्या साहित्याला भव्यता, व्यापकता येणार नाही; ताजेपणा, मधूरता येणार नाही.

महाराष्ट्रातील, भारतातील जनस्थिती बघा. ही सभोवतालची सृष्टी बघा. मनुष्याचे स्वभावही कळायला आसमंतातली नैसर्गिक परिस्थिती बघावी लागते. या निसर्गातील सौंदर्य-प्रतीती तुम्हाला येऊ दे. मला एखादे वेळेस वाईट वाटते की, महाराष्ट्रातल्या निसर्गाचे वर्णन फारसे कोणी केले नाही. गोविंदाग्रजांनी 'अंजनकांचनकरवंदाच्या देशाला' वंदन केले आहे. वासुदेव शास्त्र्यांनी 'आंबे नारळि पोफळी' असे दोन-चार श्लोक केले आहेत. ते शिकवित असता मी वर्गातून साश्रू नि सद्‌गदित होऊन उठून गेलो होतो. कवि माधव यांचे कोकणातील वर्णन, बालकवींनी केलेले सृष्टी-वर्णन, पांचगणीच्या घाटातील दृश्यावरची रे. टिळकांची कविता; अशा थोड्या कविता आहेत. परंतु हे अपवाद. कोणत्या ऋतूत कोणती फुले फुलतात, कोणते पक्षी गातात, कोणती पिके होतात, हे सुद्धा आपणास नीट माहीत नसते. शरदऋतूत कमळे फुलतात हे परंपरेनेच आम्हाला माहित आहे. मी दापोलीच्या हायस्कूलमध्ये शिकत होतो. तेथील थोर मुख्याध्यापक एकदा म्हणाले, 'कोकणात किती सौंदर्य! पावसाळ्यातील भव्य देखावे! डोंगरावर उभे राहावे. दुरून समुद्र दिसावा, झाडांवरून पाणी टपटप पडत असावे, चिंचेच्या झाडांना कोवळी पाने फुटावी.' मी वेडा होतो. परंतु याचे वर्णन कोठे नाही. या सौंदर्याला काव्यात कोणी अमर केले नाही. इंग्लंडमध्ये सदैव धुके, ढग; परंतु तिकडचा कीट्स तेथील सौंदर्याने वेडा होतो. मला त्याची प्रतिभा असती तर ? कोकणचा अपार घों घों करणारा समुद्र! परंतु बायनरप्रमाणे 'कर गर्जना कर हे सागरा' असे म्हणून कोणी कवि उचंबळला नाही. वाल्मिकी, कालीदास, भवभूती, रवींद्र हे निसर्गाचे महान उपासक होते. परंतू आपणाला निसर्गाचे प्रेम नाही. नाद नाही. वर्डस्वर्थ कवि लिलॅक फुले पाहून ' as if made of light' - 'प्रकाशाचीच जणू ही बनलेली' असे म्हणून नाचतो. आपण असे कधी उचंबळतो का?

मित्रांनो, सृष्टीचे सहृदय मित्र बना. तृणपर्णावरचे दवबिंदू पाहा. ते मोती बघा आणि गवतातून कोळ्यांनी विणलेली जाळी-सुर्यकिरणांनी रंगलेली जणू सोनेरी मोत्यांची झालरी लावलेली परींची ती हवेवर डोलणारी नाजूक मंदिरे- बघा ती मौज आणि पहाटेच्या प्रशांत वेळी झाडांवरून थेंब पडतात, जणू अश्रू- ती ऐका. ते निळे डोंगर बघा. खोल दऱ्या. नद्या-नाले, तळी, वृक्षवेली, फुले, पाखरे- सारे पाहा. एखादे साधे फुल- परंतु किती सुंदर असते! टेनिसन म्हणाला, 'एक फुल जाणणे म्हणजे विश्व जाणणे.' फुलपाखरांच्या अंगावरची नक्षी बघा. फुलपाखरांच्या पाठीमागे धावा. कोकिळेला शोधीत फिरा. घुबडाचे घूत्कार ऐका. नाचणारे मोर बघा. गायी, बैल, मांजरे- त्यांचे डोळे बघा - गंमत आहे.

खालचे वरचे सारे विश्व पाहा. आकाशातील रात्रीचे काव्य पाहा. श्री. काकासाहेब कालेलकरांचा हा जीवनाचा आनंद आहे. तो तुमचाही होवो. वेदांतील ऋषींनी मध्यान्हीच्या निळ्या निळ्या आकाशाचेही वर्णन केले आहे, आम्ही पहाटेचेही पाहाणार नाही; मग मध्यान्हीचा धगधगीतपणा नि त्यातील प्रखर सौंदर्य पाहणे दूरच राहिले. तुम्हाला ताऱ्यांचे कधी आकर्षण वाटले आहे? निळ्या आकाशाने कधी तुम्ही वेडे झाला आहात? काजव्यांची कवाईत पाहिली आहे- प्रकाशाची कवाईत?

एखाद्या डोंगरावर बसावे. समोर अनंत क्षितिज असावे. आपल्या मनाला ही सारी सृष्टी विशाल पाळण्यात घालून नाचवित आहे असे वाटते. या अनंत सृष्टीत मी वाढत आहे, अनंत होत आहे असे वाटते. अरबस्थानातील रात्रीच्या वेळच्या अनंत, निःस्तब्ध आकाशानेच पैगंबराच्या तोंडून कुराण वदविले. भारतीय सरितांनी, पर्जन्यधारांनी, वनांनी वेदोपनिषदांना जन्म दिला. रवींद्रनाथ निसर्गाजवळ शिकले. निसर्गातील गंध, रंग, प्रकाश त्यांनी लुटला आणि गीतांजलीत 'प्रकाश, प्रकाश, अनंत प्रकाश' असे म्हणत एका गानांत जणू ते नाचत आहेत असे वाटते. बालपणात त्यांनी वडिलांबरोबर हिमालयाचे अपार सौंदर्य नि उदात्त गांभीर्य प्राशन केले. पुढे मोठेपणात पद्मानदीच्या विशाल प्रवाहात ते चार चार महिने बोटीत बसून जीवन नेत. वारे, लाटा, पक्षी, आकाश, अस्तोदय, सर्वांच्या संगतीत राहात. त्याच्या काव्यात हा सुगंध नि ओलावा आहे.

सृष्टीच्या अंतरंगात शिरा. तुम्हाला तेथे अनंत वाणी ऐकू येईल. एकदा रवींद्रनाथ संध्याकाळी फिरायला बाहेर पडले, तो वादळ उठले. वृक्ष नाचू लागले. धुळीचा बुक्का, गुलाल उधळला जाऊ लागला. विराट नाच सुरू झाला. रवींद्रनाथ स्वत:ची रेशमी कफनी विसरून धुळीत बसले. त्यांचे हृदयही नाचू लागले. पुढे वादळ शांत झाले. लगेच एक अमर गीत लिहून सायंप्रार्थनेत त्यांनी म्हटले. सृष्टीचे हे महान गान तुम्हाला एकदम ऐकू येणार नाही. सृष्टीशी परिचय वाढवा, प्रेम वाढवा, तुम्हाला तिची अनंत भाषा, अनंत छंद, मग सारे कळू लागेल. जरा पहाटे उठत जा. बाहेर पडा. वारा अंगाला लागू दे. तृणपर्णे पाहा. तांबडे कसे काय फुटते, प्रकाश कसा कसा येतो. पाहा. जीवनाला मंगल असे प्रात:स्नान होईल. अमेरिकन ग्रंथकार - तो निसर्गप्रेमी थोरो म्हणतो, 'दोन तास शेतात काम करा. तुमची सारी पोटदुखी जाईल. तुमच्या लिहिण्यात तेज, तजेला, नवजीवन येईल.' आज सृष्टीपासून आपली फारकत झाली आहे. तुम्ही अजून नवीन आहात. तुम्ही ही चूक करू नका. जिज्ञासा, कौतूकवृत्ती यात साहित्याचा आत्मा आहे. प्रत्येक वस्तूजवळ जाणे, तिला बघणे, तिच्याजवळ बोलणे - यातील गंमत तर पाहा. तुम्ही झपाट्याने वाढत जाल.

अशारितीने अनेक अनुभव घ्यावे. जीवन अनुभवाने समृद्ध करावे. सृष्टीच्या सानिध्यातील अनुभव, मानवी जीवनातील अनुभव. शेतकरी व्हा, कामगार व्हा. बघा ते जीवन आणि वादळात फिरायला जा. उंच डोंगर चढा. दऱ्यात उतरा. सागरात डुंबा. एका चिनी चित्रकाराची गोष्ट आहे. वादळात, मुसळधार पावसात समुद्र कसा दिसतो ते त्याला पहावयाचे होते. तो समुद्रात कित्येक तास उभा होता, सभोवती वारे, लाटांचे तुषार नि फेस यांची अंगावर वृष्टी होत होती. वरून मुसळधार पाऊस आणि तो चित्रकार लाटांत सारखा उभा होता. सर्वांगाचे डोळे नि कान करून पाहात होता, ऐकत होता.

उत्कटतेशिवाय काही नाही. साहस, मोठमोठ्या गोष्टी, विशाल ध्येय, अपार अभ्यास, भरपूर अनुभव, असे करून जीवन सर्व बाजूंनी समृद्ध नि उदात्त करा. तेजस्वी, निर्भय आणि सहानुभूतीचे असे बना. निर्भयतेशिवाय ना जगाचे ज्ञान, ना स्वत:चे ज्ञान. तुम्ही जीवन निर्भय नि समृद्ध केलेत म्हणजे मग तुम्हाला कशाची

उणीव भासणार नाही. कल्पना, उपमा, दृष्टांत सारे भराभरा सुचेल. तो कवि मोठा, ज्याला एक गोष्ट सांगताना तत्सदृश्य हजारो स्फूरतात. संसार क्षणिक असे म्हणायचे असेल, तर बुडबुड्याप्रमाणे, मृगजळाप्रमाणे, काचेप्रमाणे, स्वप्नाप्रमाणे, छायेप्रमाणे असे भराभरा त्याला जे जे भंगुर ते ते आठवते. ज्ञानेश्वरांसमोर अशा वेळेस सारा निर्सग, सारी सृष्टी उभी राही. कारण सारा महाराष्ट्र त्यांनी पालथा घातला होता. बृहन्महाराष्ट्राचे त्यांनी दर्शन घेतले होते. बृहन्महाराष्ट्रातील शब्द ज्ञानेश्वरीत आहेत. शेक्सपिअरला, व्हिक्टर ह्यूगोला शब्दांचा तुटवडा नसे भासत. सारे धंदेवाले त्याला माहित. सर्वांशी त्यांची दोस्ती.

आणि सर्व ठिकाणाहून शब्द घ्या. जुने घ्या, नवे घ्या. बहिष्कार घालीत नका बसू. क्षुद्र, दरिद्री अहंकार नको. मराठी भाषेचा ठसा प्रत्येक शब्दावर आपण मारीतच असतो. इंग्रजीतील बोट (नांव) शब्द घेऊ. तो स्त्रीलिंगी करू. फार काथ्याकूट करीत नका बसू. अस्मान, आकाश दोन्ही शब्द राहू देत. जमीन म्हटले की अस्मान आठवते. राहू देत जमीन-अस्मान शब्द. पचवा सारे नि पुष्ट व्हा. शेकडो उर्दू शब्दही संस्कृत धातूपासून आलेले आहेत. मराठीची स्वत:ची अनंत शब्दसंपत्ती आहे. तिच्यात आले इतर शब्द म्हणून घाबरत नका बसू. साऱ्यांचा त्या त्या विवक्षित ठिकाणी उपयोग शोभतो. आपण मरतुकडे झालो आहोत. पचनशक्तीच जणू मेली. इतरांवर अजिबात बहिष्कार नको. आज जग जवळ येत आहे. इतके द्वेष-मत्सर करून जाणार कोठे?

मागे महाराष्ट्रात कोणी म्हणाले 'किसान सभा असे का म्हणता? शेतकरी-सभा म्हणा. चरका शब्द को, रहाट म्हणा. तकली शब्द नको, चाती म्हणा.' परंतू त्या सद्‌गृहस्थांना कळले नाही की, किसानांच्या संघटना आधी संयुक्तप्रांत, बिहार इकडे झाल्या, म्हणून तिकडचा किसान शब्द आला. त्या शब्दाभोवती तेजोवलय निर्माण झालेले होते. तकलीवर सूत काढू लागलो. हा नवसंदेश दुसरीकडून आला म्हणून तो शब्द रूढ झाला. ते ते शब्द उगीच येत नाहीत. ते स्वत:बरोबर चळवळ, चैतन्य, सामर्थ्य, संदेश घेऊन येतात. ते मृत नसतात. अहंकाराने काहीतरी पुटपुटण्यात अर्थ नसतो.

तुम्हाला मी तीन-चार गोष्टी सांगितल्या. सभोवतीच्या मानवी जीवनाशी एकरूप व्हा. प्राचीन इतिहास अभ्यासा, त्याप्रमाणे अर्वाचीनही, आजचाही. तिसरी गोष्ट निसर्गाशी एकरूप व्हा आणि चौथी गोष्ट थोर थोर देशीविदेशी, प्राचीन, अर्वाचीन ग्रंथकारांचा अभ्यास करा. आजच्याही थोर साहित्यिकांजवळ जात जा.

मी स्वतः दूर दूर राहणारा आहे. संकोची आहे. मी कधी कोणाकडे गेलो नाही. परंतू तुम्ही सर्वांना लुटा. नाशिकचे महाराष्ट्राचे आवडते कवि श्री. सोपानदेव चौधरी कधी भेटले तर थोर साहित्यिकांच्या संगतीतील अनंत अनुभव ते सांगतात. त्यांच्याजवळ ऐकत असता मी सद्गदित होतो. मी मनात म्हणतो, 'मी कधीच कोणाकडे गेलो नाही.' परंतु माझा भिडस्त, बुजरा स्वभाव.

'थोरांपासून दूर दूर फिरतो लाजून वस्त्राविणे'

परंतु तुम्ही असे नका होऊ. जिकडून जे घेता येईल, ज्याच्यापासून जे शिकता येईल, ते आदराने घ्या आणि वाढा.

अशी तयारी तुम्ही करा. अशी तयारी करीत असतानाच लिहिण्याची सवय ठेवा. मनात भावना, विचार जमले आहेत असे वाटले की लिहा. फुलायच्याआधी कळी फुगीर दिसते; आत गंध नि रंग इतके भरतात की, शेवटी पाकळ्यांना कळा लागून ते सारे विकसन प्रकट होते. तसे तुमचे होवो. उत्तरोत्तर अधिकाधिक सामर्थ्य येईल, आत्मविश्वास येईल.

मी तुम्हाला आता प्रत्यक्ष कार्याची कल्पना देणार आहे. तुम्ही सारे कुमार साहित्यिक आहात. कुमार साहित्याचा द्विविध अर्थ होईल. कुमारांसाठी लिहिलेले साहित्य, कुमारांनी लिहिलेले साहित्य आणि उद्या हातून सुंदर साहित्य निर्माण व्हावे म्हणून सामुदायिक प्रयत्न करणारे हे तुमचे मंडळ. तुमचे असे हे त्रिविध स्वरूप आहे.

कुमारांसाठी मराठीत फारसे साहित्य नाही. जीवनातील अनेक गोष्टींना स्पर्श करणारे बालसाहित्य, विश्वाची कल्पना देणारे साहित्य मराठीत नाही. मुलांसाठी केवळ गोष्टी नकोत, त्यांचा उपयोग नाही असे नाही. त्यांतून त्यांना आनंद मिळतो. त्यांच्या भावनांना सुंदर वळण लागते. त्यांची कल्पनाशक्ती जागी होते. असा

पुष्कळ उपयोग आहे. परतु विसाव्या शतकातील जीवनाचे एवढ्याने संवर्धन होणार नाही. मित्रांनो, तुम्हाला तुमच्या लहानपणात या अडचणी भासल्या असतील. तुमची लहान भावंडे पुस्तके द्या म्हणून पाठीस लागतात. आपणास अडचण पडते. आहेत कोठे पुस्तके? कुमारांसाठी अनेक विषयांवरची हजार तरी पुस्तके तयार करायला हवी आहेत. शिक्षक, प्राध्यापक, लेखक सर्वांचे सहकार्य हवे. सरकारी मदत हवी. जर्मनीत १९१४ पूर्वी मुलांच्यासाठी एकेका शास्त्रीय विषयावर पाऊणशे पाऊणशे छोटी पुस्तके केली गेली होती. वनस्पतीवरची, ताऱ्यांवरची, इंजिनांवरची. मोठमोठी चित्रे त्यात नाना भाग, रंग मुलांची जिज्ञासा वाढवायला हवी. आनंदचे आद्य संपादक वासुदेव गोविंद हयांनी का व कसे अशा शास्त्रीय माला निर्मिल्या होत्या, हे शास्त्रीय ज्ञान द्यायला हवे. तसाच इतिहास. मुलांना एकदम जागतिक इतिहास शिकवावा. जगाचे नागरिक त्यांना बनवावे. समुद्रातील लाट ज्याप्रमाणे दुरून वाढत येते, त्याप्रमाणे जागतिक इतिहासातील विचारलाटा दोन-दोनशे वर्षे वाढत येतात. जागतिक जीवनात दोनशे वर्षे म्हणजे दोन दिवसच होत. तो पाहा अतिप्राचीन काळ. तेथे इजिप्त, बाबिलोन, मोहोंजोदारो या सर्व प्रदेशांत एक संस्कृतीची महान लाट आलेली दिसते. दाखवा ती मुलांना. दाखवा तिच्यातील रंग. नंतर ती पाहा २५०० वर्षापूर्वीची दुसरी वैचारिक लाट. तिकडे ग्रीस देशात सॉक्रेटीस, प्लेटो, येथे भगवान बुद्ध नि महावीर. चीनमध्ये ला ओत्सी नि कन्फ्यूत्सी. दाखवा मुलांना त्या लाटेचे रंग, उंची नि भव्यता. ती पाहा पंधराव्या-सोळाव्या शतकातील धर्मसुधारणेची लाट. युरोपात ल्यूथर वगैरे, हिंदुस्थानात साधुसंत. त्याच्या पुढची स्वातंत्र्याची लाट पाहा. जगात सर्वत्र स्वातंत्र्याचे लढे. अशा रितीने मुलांना जागतिक लाटांवर नाचवावे. मग पुढे वाढत्या वयाबरोबर अधिक रंग त्यात भरावे. हे इतिहास; त्याप्रमाणेच सर्वप्रकारच्या थोरांची चरित्रे-धगधगीत नि जळजळीत, ठसठशीत नि प्रासादिक.

मुलांच्या पुस्तकात नुसती बोध-भाषा नसावी. विनायक कोंडदेव ओक यांनी बालबोध मासिक पूर्वी चालविले. त्यांची भाषा सुबोध असे. परंतु त्यात प्रसाद नि मधुरता नसे. मुलांची जीवने छंदोमय असतात. 'पाऊस पडत आहे;' हे वाक्य त्यांना आवडणार नाही. पाऊस झिमझिम पडत होता. वारा भिरभिर करत होता.

तारे चमचम करीत होते. ओढा खळखळ वहात होता. असे त्यांना आवडते. मुलांच्या जीवनातील संगीत कळल्याशिवाय मुलांच्या हृदयाची पकड घेणारे वाङ्मय लिहिता येणार नाही. त्यांना ताऱ्यांची, वाऱ्यांची, वनस्पतींची, रसायनशास्त्राची, विद्युतशास्त्राची, सर्व सृष्टीची माहिती द्या, ती क्लिष्ट नको. शास्त्रीय असून सोपी नि गुदगुल्या करणारी अशी ही पुस्तके हवीत. ही केवळ क्रमिक पुस्तके नसावीत. अबाल स्त्री-पुरूषांना खेड्यापाड्यातून समजतील अशीही हवीत. हे प्रचंड कार्य आहे. तुमच्या या मंडळातून उद्या कुमारांसाठी असे वाङ्मय निर्माण करणारे उभे राहोत. आजपासून ठरवा. मी हे लिहिन. तू ते लिहि. वीस वर्षांनी मराठीत एक हजार पुस्तके विविध विषयांवरची सोपी, सुटसुटीत अशी निर्माण करा. महाराष्ट्राचे तुम्ही पांग फेडाल. अनाथ विद्यार्थीगृहाची स्वाध्यायमाला अशाप्रकारचे थोडे कार्य करीत आहे.

ही पुस्तके सोपी असून स्वस्त हवीत. एकदा पुज्य विनोबाजी म्हणाले, 'लिहून पैसे मिळवणे पाप. श्रमाने पैसे मिळवा. पुस्तकाचा खर्च भागेल इतकीच किंमत ठेवा. ज्ञान विकू नका.' मी श्यामची आई- २५० पाने, सुंदर तिरंगी चित्र- प्रथम १९३५ मध्ये १ रूपयाला ठेवली. माझ्या कवितांचे ४२५ पानांचे 'पत्री' पुस्तक - त्याची दीड रूपया किंमत ठेवली होती. परंतु पुढे मला सार्वजनिक कामासाठी, अनेक स्नेह्या-सोबत्यांसाठी पैशाची ददात पडे. श्रीमंताजवळ मागायला संकोच आणि आमची पतही नाही. कारण भांडवलशाहीला आम्ही उखडू पाहाणारे. तेव्हा पुस्तक एवढेच साधन राहिले. जास्त पैसे देणारा प्रकाशक गाठावा. मग त्याने अधिक किंमत ठेवली तरी बोलता येत नसे. मी लाचार आहे. मला याचे वाईट वाटते. मला अनेक खेड्यातील मित्र म्हणतात, 'गुरूजी, तुमच्या पुस्तकांची किंमत फार.' मी त्यांना माझी अडचण सांगतो.

मित्रांनो, तुम्ही काहीतरी योजना करा की पुस्तके स्वस्त देता येतील. तुमची उपजीविका त्यातून नका अपेक्षू. अर्थात हा ध्येयवाद झाला. जमेल तसे करा.

दुसरी गोष्ट म्हणजे महाराष्ट्रभर हिंडून सारे परंपरागत वाङ्मय गोळा करा. मी एका खेडेगावात काही दिवस राहात होतो. तेथील वृद्ध बाप्पाजी म्हणाले, 'आज मी गोष्ट सांगतो.' त्यांनी गोष्ट सुरू केली. दोन-तीन दिवस ती गोष्ट चालली होती.

आपल्याकडे पूर्वी छापखाने नव्हते. इंग्रजीत well- read 'पुष्कळ वाचलेलाद असा शब्द आहे. आपल्याकडे 'बहुश्रूत' असा शब्द आहे. परंपरागत तोंडोतोंडी वाङ्मय येई. लोक ऐकत. कहाण्या, उखाणे, ओव्या, गाणी, पोवाडे, गोष्टी सारे तोंडी असे. वाङ्मयाशिवाय समाज जगू शकत नाही. ते साहित्य आज नष्ट होत आहे. तुम्ही ते सारे गोळा करा. जावे एखाद्या गावात. दवंडी द्यावी. जो गोष्ट सांगेल त्याला चार आणे, आठ आणे देऊ. अशारितीने सर्व प्रकारच्या गोष्टी, अख्यायिका, दंतकथा गोळा करा. जर्मनीतील ग्रीम् बंधूंनी बारा वर्षे हिंडून अशा गोष्टी गोळा केल्या. त्या गोष्टी जगातील मुलांना आनंदवित आहेत. आपल्या महाराष्ट्रातील ग्रीम् बंधू केव्हा उत्पन्न होणार? तुम्हाला खानदेशी लोककथा सांगू?

एका गावातील एका बाईला एक मुलगा होता. पुढे बऱ्याच वर्षांनी तिला दुसरे मुल झाले. परंतु ते मुल म्हणजे साप होता. त्याला नाग्या म्हणत. नाग्या घरात हिंडे-फिरे. मोठ्या भावावर त्याचे अपार प्रेम. भावाबरोबर शेतावर जाई. वेटोळे करून बसे. भावाबरोबर दूध पिई. भाऊ गाणी म्हणवून त्याला निजवी. एकदा मोठ्या भावाला परगावी जरा लांब जायचे होते. तो नाग्याला म्हणाला, 'नाग्या, मी लौकर येईन.' भाऊ गेला, नाग्या दिवस मोजीत होता. आठ दिवस झाले भाऊ परतला नाही. नाग्या जेवेना, दूध पिईना. आई म्हणाली, 'नाग्या, असे किती दिवस करणार? जा नाहीतर, आण भावाला शोधून.' नाग्या ख़रेच बाहेर पडला. रस्त्याचे बाजूने चालला. रात्र झाली. नाग्या जात होता. भ्रातृचिंतनात मग्न होता. तिकडून एक बैलगाडी येत होती. नाग्याला भान नव्हते. गाडी अंगावरून ग़ेली. नाग्या चिरडला गेला. त्या गाडीत तो मोठा भाऊ होता. गाडी घरी आली. भाऊ घरात गेला. नाग्या दिसला नाही. भावाने विचारले, 'आई, नाग्या कोठे आहे? झोपला वाटते?' 'नाही रे, तुलाच शोधायला गेला. घरी खाईना पिईना.' भाऊ नाग्याला शोधीत निघाला, तो वाटेत नाग्या चिरडलेला दिसला. भाऊ रडला. पुढे तेथे त्याने नागाची एक दगडी मूर्ती करून बाजूला बसविली. रोज तेथे दुधाचा नैवेद्य आणून तो दाखवी. ती दगडी मूर्ती अजूनही डॉ. उत्तमराव पाटील- क्रांतीवीर- यांच्या गावाजवळ आहे. हिंदुस्थानातील नागही माणसावर प्रेम करणारे होते. तेथे भाऊ भाऊ नाही का करणार? प्रभूला माहीत.'

नगर वाचनालय सातारा
बाल विभाग

अशा माणिक-मोत्यांसारख्या लोककथा मिळतील. दोन-चार लोककथा छापून कृतार्थतेचे नगारे वाजवू नका. सोळा वर्षाच्या ज्ञानदेवांनी दहा हजार अमृतासमान ओव्या लिहिल्या. नाथांनी किती लिहिले. तुकारामांचे पाच हजार अभंग, पन्नास हजार ओळी. दासोपंतांनी किती लिहिले त्याला अंत ना पार. मोरोपंतांची पाऊण लाख कविता. कोठे हे अतिभारती लेखक- कोठे आपुला मरतुकडा वाग्विलास. थोडेसे लिहितो नि नाचतो. काय ते पदोपदी प्रकाशनसमारंभ नि उदो उदो. युगप्रवर्तक ग्रंथ असेल तर प्रकाशन समारंभाला अर्थ. लेखकाला आपले कौतुक व्हावे असे वाटते. प्रत्येकाला आपले लिहिणे आवडते. आपआपके तानमें चिडियां भी मस्तान है. परंतु उठल्याबसल्या प्रकाशन समारंभांनी सारे गांभीर्य जाते. तुमच्यासमोर ते ज्ञानवैराग्याचे धगधगीत सुर्य राजवाडे आहेत. गावोगाव हिंडून त्यांनी पत्रे गोळा केली. त्यांनी महान कार्य केले. तुम्ही गोष्टी, गाणी, ओव्या, दंतकथा सारे गोळा करा. बृहन्महाराष्ट्रात जवळ जवळ दोनशे तालुके. एकेका तालुक्यात चार-चार कुमार सुट्टीत हिंडोत. वर्ष-दोन वर्षात करा सारे गोळा नि कोणाकडून नीट संपादन करवा. कुमार साहित्य मंडळाचे ते अमर कार्य होईल.

तसेच महाराष्ट्रातील प्रत्येक गावची हकीगत गोळा केलीत तर साडेतेरा हजार गावांचा ज्ञानकोष होईल. किती सुंदर हकीगती असतात. सिंहगडच्या पायथ्याजवळील खानापुरला मी गेलो. तेथे काँग्रेसप्रेमी श्री. थोपटे आहेत. तेथील सेवापरायण डॉ. मोडक म्हणाले, 'शिवाजी महाराजांनी यांची पाठ थोपटली म्हणून हे आडनाव पडले.' माझे डोळे थोपट्यांच्या चरणाकडे एकदम वळले. इंग्रजांनी जिल्ह्या-जिल्ह्यांची माहितीपूर्ण गॅझेटे लिहिली. तुम्हा आम्हाला हे सारे करायचे आहे. आपली आपल्याला ओळख नाही. मुलांनी आपल्या आयुष्यातील मार्मिक आठवणी, प्रसंग लिहून काढावे. त्यांच्या निवडीचे सुंदर पुस्तक होईल. मुले कधी कधी मार्मिक बोलतात. श्री सोपानदेव चौधरी म्हणाले, 'माझा लहान मुलगा एकदा म्हणाला, 'गारा म्हणजे पावसाचे बीद किती सुहृदय बालकल्पना.' तुम्ही कान डोळे उघडे ठेवा. सर्वत्र ज्ञान आहे, काव्य नि वाङ्मय आहे. मित्रांनो, स्वतंत्र प्रतिभेचे नि प्रज्ञेचे होऊन महनीय निर्मिती करू लागेपर्यंत सामुदायिक सहकार्याने अशी

कितीतरी कामे तुम्हाला करता येतील. इच्छा हवी, उत्कटता हवी, तळमळ हवी. माझ्या मराठी भाषेचा मला फकीर होऊ दे, ही निष्ठा हवी.

जुने वाङ्मय गोळा करा. सुंदर अनुवाद करून पाट बांधून आणा. भव्य निर्मिती करा. साहित्याचे तुम्ही थोर उपासक आणि साहित्याच्या द्वारा जीवनाचे उपासक व्हा. कोणत्याही विषयाचे सम्यक् ज्ञान, इतर अनेक विषयांची चालचलाऊ माहिती असलेले असे व्हा. आजच्या जीवनात वावरायचे आहे, बोलायचे आहे, लिहायचे आहे, हे विसरू नका.

आणि आज देशात स्वातंत्र्याची हवा आहे. आपण स्वराज्याची घटना बनवू पाहात आहोत. भारतीय भवितव्य निश्चित करून तदर्थ आपण आत्मसमर्पणाची भाषा बोलत आहोत.अशा वेळेस तुम्ही आम्ही जन्मलो आहे. तुमच्या सभोवती प्रक्षुब्ध वातावरण आहे. अपार वेदनातून, बलिदानांतून, दिव्यांतून, राष्ट्र नुकतेच गेले. पुन्हा ही कसोटी घेतली जाणार का? मित्रांनो, तेजस्वी कुमारांनो, ज्या राष्ट्रात जन्मलेत, वाढलेत, त्या राष्ट्राच्या जीवनापासून दूर नका राहू. दुर्दैव की, महाराष्ट्रातील लेखक राष्ट्रीय आंदोलनाशी तितके एकरूप नसतात आणि ज्याच्याशी आपण एकरूप होत नाही ते रंगवता तरी कसे येणार? राष्ट्राच्या इतिहासात ४२ च्या आंदोलनात किती अमर प्रसंग आहेत! पूज्य विनोबा वर्ध्याच्या ९ ऑगस्टच्या मागील वर्षीच्या सभेत म्हणाले, 'कवींना आणि कादंबरीकारांना कित्येक वर्षे पुरेल इतका मालमसाला ४२ च्या चलेजावच्या लढाईने दिला आहे.' महाराष्ट्रातले किती प्रसंग! करूण नि गंभीर! तो कोवळा शिरीषकुमार, तो भगवान भुसारी, ते वीरशिरोमणी भाई कोतवाल; ते वसंत दाते नि कमलाकर दांडेकर; ते नऊ गोळ्या खाऊन मरणारे परशराम पहिलवान; तो सातारचा आयुर्वेद विद्यार्थी पेंढारकर रानात अज्ञातवासात टायफाईडने देवाघरी गेला; रत्नागिरी जिल्ह्यातील सब-इन्स्पेक्टरच्या हातातील पिस्तुल धरणारी पुत्रवत्सल वृद्ध माता! वसंत पाटील वगैरेंचे सांगलीच्या तुरूंगातून ते रोमांचकारी निसटून जाणे! तो सिंधमधील हेमू! तो फाशी गेलेला नागपूरचा विष्णू! पाटण्याचा तो युसुफ! आणि चिमूर! आणि आगाखान राजवाड्यातील अनंत अर्थ मुकेपणाने सांगणाऱ्या त्या दोन समाध्या; महात्माजींचा तेथील उपवास; सरकारने त्यासाठी जमवून ठेवलेले चंदन आणि

महात्माजी गेले तर तत्काळ लाखो गुप्त पत्रके काढून हिंदुस्थानला सांगता आले पाहिजे म्हणून डोळ्यातून अश्रू ढाळीत जयप्रकाशांनी लिहून ठेवलेले ते बुलेटीन! मित्रांनो, सारा रक्ताचा नि अश्रूंचा हा इतिहास तुमच्यासमोर आहे. एखादा ईश्वरी देण्याचा श्री. शंकरराव निकमांसारखा थोर शाहीर, एखादा उदयोन्मुख प्रतिभाशाली वसंत बापट या भावनांना वाचा देत आहे. परंतु तुमचे सर्वांचे काय? उसळतात का सर्वांच्या भावना? पेटते का हृदय! ते भीषण दुष्काळ आणि नौखाली हत्याकांड- आणि आज आगीत अमृतकुंभ घेऊन तेथे गेलेले राष्ट्राचे प्राण महात्माजी!

आणि ती आझाद सेना! ते नेताजी! ती त्यांची वाणी, तो त्याग, ते कष्ट, ते ध्येयसमर्पण! तो चलो दिल्ली, जयहिंद नाद! माझे एक मित्र श्री. सितारामभाऊ चौधरी नुकतेच हिमालयातून कैलास मानससरोवर वगैरे पाहून आले. ते म्हणाले, 'कैलासावरही जयहिंद शब्द कोरलेला दिसला!' जणू भारताचे रक्षण करणारा शिवशंकर डमरू वाजवून जयहिंद गर्जत आहे!

मित्रांनो, पृथ्वीमोलाचे प्रसंग. मढ्यांना उठवणारे, पाषाणांना पाझर फोडणारे, पर्वतांना वाचा देणारे, आकाशाला गहिवरणारे, विश्वाला हदरवणारे प्रसंग. परंतु कोण बघतो? तंत्रीला बोटाचा स्पर्श होताच तिच्या तारांत कंप उत्पन्न होऊन तिचे संगीत दूरवर जाते. ती लहानशी तंत्री विश्वाच्या हृदयाला भेटते. तुमच्या हृदयतंत्रीच्या हजारो तारांना या भावनांचा स्पर्श होतो का? जेव्हा कलावानाच्या आत्म्यावर स्पंदने होतात, आघात होतात, तेव्हा त्या स्पंदनांतून जे निर्माण होते ते जगाचे होते. ते व्यक्तीचे राहात नाही. ते उद्‌गार महान होतात. त्यांना अमरता येते. हेच सौंदर्य. सौंदर्य ही एकच गोष्ट दिक्कालातीत आहे. त्या त्या वेळची ध्येये बदलतात, परंतु त्या त्या वेळच्या ध्येयासाठी जे त्याग, जी बलिदाने, जे वनवास भोगावे लागतात, त्यातील भव्यता ही सदैव वंदनीयच असते. म्हणून रामायण, महाभारत आजही हृदयावर सत्ता गाजवीत आहे.

परंतु लक्षात ठेवा की, रामायण-महाभारत एकदाच लिहिले जात नाही; रचिले जात नाही. ते नेहमी रचिले जात असते. राष्ट्र स्वतंत्र असो वा परतंत्र, राष्ट्राचे चारित्र्य सतत घडत राहिलेच पाहिजे. आज पारतंत्र्यातही पृथ्वीमोलाची माणसे गेल्या शंभर-पाऊणशे वर्षांत आम्ही जितकी दिली, तितकी स्वतंत्र देशांनीही

दिली नसतील. ज्या पारतंत्र्यात इतकी नवरत्ने निर्माण झाली, त्या पारतंत्र्यासही प्रणाम करावासा वाटतो.

कुमारांनो, उद्याचा भविष्यकाळ तुमचा आहे. उद्याची ध्येये तुमच्याभोवती प्रदक्षिणा घालीत आहेत. सर्व प्रकारची संकुचितता, प्रांतीयता, जातीयता झडझडून फेकून उभे राहा.

घालून अकलेचा पवाड । व्हावे ब्रह्मांडाहूनि जाड ।
तेथे कैचें आणिलें द्वाड । करंटेपण ।

असे समर्थ म्हणाले, वेदांमध्ये सरस्वती- वाणीदेवता म्हणते :

'अहं राष्ट्री संगमनो जनानाम्'

'मी वाणी राष्ट्रासाठी आहे. सकल लोकांचे संगमन-संगम-एकत्र स्नेहसंमेलन करू पाहाणारी आहे.' हे ऋषींचे ध्येय तुमच्याही वाणीचे असो. ज्ञानेश्वर म्हणाले,

'भुतां परस्परे पडो । मैत्र जीवाचे ।'

माझ्या लिहिण्याने स्नेह वाढो. खरी मैत्री उत्पन्न होवो. गड्यांनो, द्वेष वाढेल असे लिहू नका. निर्भयता, स्वाभिमान या निराळ्या गोष्टी आणि सूड, द्वेष या निराळ्या गोष्टी. गटे म्हणाला, 'मी द्वेषाची गाणी गाणार नाही.'

आज सारे जग जवळ येत आहे सारे जणू तिमजली घर होत आहे. कोठेही सूडबुद्धीने आपण धक्का मारला, तरी या तुमच्या घरावरच त्याचे आघात. तुमच्या बोटीलाच भोके. सारे एका बोटीत बसलेले- कोणी या टोकाला, कोणी त्या टोकाला, एवढाच फरक. हे सांगण्याबद्दल माझ्यावर टीका होतील. होवोत. तरीही मला सांगितलेच पाहिजे की सावधगिरीने, भावना भडकल्या तरी विवेकाचा ब्रेक लावून तुम्ही बोला नि लिहा. वाणी ही महान वस्तू आहे. तुम्हाला तरी उज्ज्वल, मंगल दिसो. भारतात सारे गुण्यागोविंदाने नांदत आहेत, द्वेष शमले आहेत, परस्परांची संस्कृती अभ्यासित आहेत, अनेक भाषा शिकत आहेत, विकास करून घेत आहेत, ज्ञानविज्ञान वाढत आहे, कला फुलत आहे. सर्व जनता त्यांच्या संवर्धनात सामील होत आहे, व्यक्तिस्वातंत्र्याचीही मर्यादित प्रतिष्ठा ठेवणारा समाज आला आहे, वर्ग नष्ट झाले आहेत, स्पश्यास्पृश्ये इतिहास जमा झाली आहेत, गावे गजबजली आहेत, मोठे उद्योगधंदे राष्ट्रीय होत आहेत, प्रगतीसाठी राष्ट्र आवश्यक गरजा

भागवून अनंत हात पसरून पुढे जात आहे, अज्ञान, रूढी, रोग नष्ट होत आहेत. प्रयोग चालले आहेत, हिमालयावर चढत आहेत, आकाशात उडत आहेत, ताऱ्यांवर जाऊ पाहात आहेत, सागराच्या तळाशी ज्ञानासाठी जात आहेत, ज्ञानासाठी नचिकेताप्रमाणे मृत्यूशी स्नेह करीत आहेत. असा हा भारत शास्त्रीय नि ध्येयवादी तुमच्या डोळ्यासमोर उभा राहू दे. तुमची स्वप्ने, तुमच्या आशाआकांक्षा, यातूनच नवा भारत बनायचा आहे. तुम्हीच भारत-भाग्यविधाते तुमचा जय हो.

आजपर्यंत जगाला वाङ्मयानेच वाढविले, वळण दिले, आनंद दिला, माणुसकी दिली. वाङ्मयानेच सहृदयता, उदारता, बंधुता, पुरूषार्थ, पावित्र्य, प्रेम, न्याय ही दिली आहेत. भारतीयांची मनोरचना पाहा. विचार, आचार पाहा. कोणी त्यांना रंगरूप दिले? रामायणाने, महाभारताने, कबीरांच्या गाण्यांनी, तुलसीरामायणाने, गोपीचंदांच्या गीतांनी, मीराबाईच्या मधुर भजनांनी, ज्ञानेशांच्या ओवीने, तुकोबांच्या अभंगाने, वामनी श्लोकाने, मोरोपंती आर्येने, रामदासांच्या वाणीने, शाहीरांच्या रसवंतीने, बायकांच्या कहाण्यांनी, अशा सर्व वाङ्मयाने भारतीय जीवनाला रंग दिला आहे. प्राचीनांनी त्यांच्या कलानुसार ध्येये दिली, विचार दिले. आजच्या युगधर्माला अनुरूप अशी गाणी, गोष्टी, विचार तुम्ही द्या. तुमची जबाबदारी मोठी आहे. तुम्ही जी गीते लिहाल, ज्या गोष्टी रचाल, जी नाटके लिहाल, निबंध लिहाल, त्यांतून जनतेच्या मनोबुद्धीला वळण मिळेल. लिहिलेला वा बोललेला प्रत्येक शब्द म्हणजे पेरणी आहे. वेडेवाकडे लिहू नका, तुमचा होईल खेळ, राष्ट्राचा जाईल प्राण. म्हणून सादीने म्हटले आहे 'पांढऱ्यावर काळे करण्यापूर्वी शंभरदा विचार कर.' अमृत नसेल देता येत, दूध द्या. तेही न जमले तर निर्मळ जीवन द्या. परंतु दारू नको. जीवनात विनोद, हास्य यांना महत्वाचे स्थान आहे. परंतु साऱ्या जीवनाचे हसे करू नका. विनोदही दोषांतून, चुकीतून दाखवा. इंदुबिंदूच्या कुरूपतेतून निर्माण होणारा विनोद नको. खेडवळांची भाषा नाटकात वापरून त्यांच्या भाषेची थट्टा करणारा विनोद नको. असो. मी तुम्हाला काय सांगू, किती सांगू? उपदेश करायला मी उभा नाही. तुमचा प्रेमळ भाऊ म्हणून मी बोलत आहे. मन मोकळे करून बोलत आहे. महाराष्ट्राचा कायापालट करा. लोकांना वाङ्मय द्या. ते वाचण्यासाठी त्यांना साक्षर करा. क्रांती करा. मराठी

वाङ्मय पहिल्या प्रतीचे करण्याची प्रतिज्ञा करा. मी साधे सरळ लिहिले, त्यात कला नाही, पाल्हाळ असेल. परंतु मी अपाय करणारे सहसा लिहिले नाही. महाराष्ट्रातील हजारो मुले-बाळे, स्त्रिया, शेतकरी, कामकरी त्याने आनंदले आहेत. सातारा जिल्ह्यातील भूमिगत कार्यकर्ते अज्ञातवासात माझी पुस्तके वाचीत. ते रडके नाही झाले. मी नवविचार, उदार भावना दिल्या आहेत. शनिमहात्म्याचे धर्म मी दिले नाहीत. टीका करणारे टीका करोत. माझे लिहिणे पै किंमतीचे ठरवोत, परंतू त्या पै किंमतीच्या लिखाणाचाही खूप उपयोग होऊन राहिला आहे, हे महाराष्ट्रभर हिंडणाऱ्या मला माहीत आहे. भूक लागली असता हिरेही फेकावेसे वाटतात आणि पै किंमतीचे डाळमुरमुरेहि पृथ्विमोलाचे वाटतात.

परंतु माझ्यातील दोष तुम्ही टाळा. संयम, कला, शास्त्रीय दृष्टी, अभ्यास ही अधिक आणा. तुम्ही मोठे व्हा. मराठी सरस्वतीचे अलंकार व्हा; परंतु तुमच्या कलेचे दैवत जनताजनार्दन असो. लोकमान्यांनी गीतारहस्य 'श्रीशाय जनतात्मने' अर्पण केले. जनतारूपी परमात्म्यासाठी त्यांचे ज्ञान होते. कलासुद्धा कशाचे तरी प्रतीक असते. कला कलातीत वस्तूकडे नेते. सायंकाळचे रंग अनेक भावनाची प्रतीके असतात. सायंकाळच्या छाया पाहताच रवींद्रनाथांना मृत्यु आठवे. सारी सृष्टीच प्रतीकात्मक आहे. म्हणून तुमची साहित्यिक कलाही कशाची तरी प्रतीकच असणार. हे प्रतीक जनता असो, तिचे सर्वांगीण स्वातंत्र्य असो.

माझ्याजवळ सांगायला अधिक नाही, साध्या गोष्टी मी सांगितल्या. कलेचा उहापोह, आनंदमीमांसा, निर्विकल्प, कविकल्प समाध्या, यांत मी कधी बुड्या मारल्या नाहीत आणि ज्याचा अनुभव नाही ते सहसा मी बोलत नाही. तुम्ही मला हट्टाने येथे आणले. माझ्याजवळचे प्रेमाने नि आपुलकीने मी देत आहे. ते घ्या. पराक्रमी, पुरूषार्थशाली व्हा. मराठी सारस्वत सामर्थ्यशाली, सर्वंकष करा. मराठी साहित्याचा विजय असो. महाराष्ट्राचा, भारताचा भविष्यकाळ उज्ज्वल बनवणारे ते होवो. तुमच्या प्रेमाचा मी ऋणी आहे. कुमारांचा विजय असो. जय हिंद !

मराठी कुमार साहित्य संमेलन, सोलापूर
अध्यक्षीय भाषण, डिसें. १९४६

पू. सानें गुरुजी जन्मशताब्दी निमित्त

चेतश्री - प्रकाशने

★ छात्रालय / साने गुरुजी / रु. २०

★ चंद्रोदय / साने गुरुजी / रु. २५

★ देवाघरच्या फुलांनो / साने गुरुजी / रु. ३०

★ उमाळा / साने गुरुजी / रु. ३५

★ अमृताहुनी गोड / डॉ. ग. ना. जोशी

★ पू. साने गुरुजींचे तत्त्वचिंतन / डॉ. ग. ना. जोशी

★ साने गुरुजींचे दुर्मिळ छायाचित्र

☘ आगामी ☘

★ पू. साने गुरुजींचे साहित्य-चिंतन / संपा. वा. रा. सोनार

★ तत्त्वज्ञानाची कहाणी / अनु. साने गुरुजी
संपा. ग. ना. जोशी

(उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सहकार्याने)

★ साने गुरुजींचा पोवाडा / शिसोदे गुरुजी

: संपर्क :

चेतश्री प्रकाशन

मुक्ताई, धुळे रोड, अमळनेर ४२५४०१.